कर्नाटक सरकार

# माय–मराठी

# 10

## मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक

MARATHI FIRST LANGUAGE

**Part - 2**

**इयत्ता दहावी**

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)**
6th Cross, Malleshwaram, Bangalore - 560 003.

# अनुक्रमणिका

गद्य


| अ. क्र. | पाठाचे नाव | साहित्य प्रकार | लेखक/ लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 7. | हिरवे सांगाती | ललित लेख | गुलजार | 1 |
| 8. | मेळघाटाचे शिल्पकार | संपादित लेख | मृणालिनी चितळे | 7 |
| 9. | वाटणी | ग्रामीण कथा | रा.रं. बोराडे | 12 |
| 10. | क्रांतिज्योती सावित्रीबाई | एकपात्री नाट्य | सुषमा देशपांडे | 19 |
| 11. | आई समजून घेताना | आत्मकथन | उत्तम कांबळे | 20 |
| 12. | स्वरगंगा | व्यक्तिचित्र | डॉ. संध्या देशपांडे | 32 |
| अ. क्र. | कवितेचे नाव | साहित्य प्रकार | कवी/ कवयित्री | पृष्ठ क्र. |
| 7. | पृथ्वीचे प्रेमगीत | प्रेमकविता | कुसुमाग्रज | 39 |
| ♦8. | सत्कार | निसर्ग कविता | मंगेश पाडगावकर | 44 |
| ♦9. | नेनंता गुराखी | ग्रामीण कविता | इंद्रजीत भालेराव | 49 |
| 10. | धरण | दलित काव्य | दया पवार | 53 |
| 11. | सुन्या तिच्याही दाही दिशा | स्त्री समस्याप्रधान | अनुराधा पाटील | 57 |
| 12. | पाठ आणि पोट यांचा झाला टाळ | नवकाव्य | विंदा करंदीकर | 62 |
| | व्याकरण, लेखन, | | | 66 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ-7 : हिरवे सांगाती

K6U9M4

गुलजार

परिचय :

संपूरन सिंग कालरा (1936-) हे कवी, गीतकार, नाटककार, चित्रपट निर्माते. दिग्दर्शक आहेत. 'गुलजार' या नावाने हिंदी आणि उर्दू भाषेत लेखन केले आहे. चाळीस वर्षांहून अधिक काळ चित्रपटांसाठी लेखन केले आहे. 'मेरे अपने', 'आँधी', 'मौसम', 'परिचय', 'इजाजत' व अनेक चित्रपटांसाठी गीतलेखन केले आहे. त्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचा हिन्दी व उर्दूत 'कुसुमाग्रजकी चुनी सुनी नगमें' या नावाने अनुवाद केला आहे. त्यांना 2002चा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे तसेच त्यांना 2004चा 'पद्मभूषण' पुरस्कार मिळाला आहे. गीतलेखनासाठी ग्रॅमी, ऑस्कर ॲवार्ड मिळाले आहे. 2014 सालचा 'दादासाहेब फाळके' पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. या पाठात त्यांनी झाडाचे आणि मनुष्याचे नाते किती दृढ आहे हे सांगितले आहे. या वृक्षांना ते आपले सांगातीच सम जतात. या पाठाचा प्रकार ललित लेख असून 'ऋतुरंग' (दिवाळीअंक) यातून निवडला असून 'सविता दामले' यांनी मूळ लेखाचा अनुवाद केला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



(मूल्य - वृक्षप्रेम)

कोट्यवधी वर्षांपूर्वी पृथ्वी सूर्यापासून अलग झाली ती हळू हळू थंड होत गेली. तिच्यावर जी माती आली तीतूनच पुढे नवीन जीव जन्माला आले. सुरवातीला या जगात जन्माला आलेला जीव

म्हणजे वनस्पती. मग हळू हळू उत्क्रांती होत मानवाची निर्मिती झाली. म्हणजे पहिली वनस्पती हे एक टोक मानले, तर मनुष्य हे साखळीचे दुसरे टोक आहे. त्यामुळे मला वाटते माणूस हा झाडा- सारखा आहे, ऊन, सावली, थंडी, उष्णता या सगळ्यांचा जसा झाडांवर परिणाम होतो, तसाच तो माणसांवरही होतो. आसपासच्या वातावरणामुळे माणसाचा स्वभाव बदलतो. त्याचा रक्तदाबसुद्धा बदलतो. त्यामुळे झाडाशी आपलं फार पूर्वीपासूनच कौटुंबिक नातं आहे असं मला वाटतं, म्हणून मनुष्य हा देखील एक झाडच आहे.

पिंपळ हा पुरातन वृक्ष. आमच्या पूर्वजांसारखाच आहे. त्यातले रेणू हे मानवी शरीरातील रेणूंशी मिळते जुळते आहेत. म्हणूनच पिंपळाचा प्रत्येक अवयव औषधीच्या किंवा इतर कुठल्या रुपात आपल्या हाती येतो. अशा या पिंपळाला आपल्या पूर्वजांनी देवाचं स्वरूप दिलं आहे. त्याच्याभोवती पार बांधला अशासाठी की, त्याचं रक्षण होईल. त्याच्या छायेत वाटसरूला दोन घटका डोकं टेकता येईल. लहानपणी आम्हा मुलांचा आवडता खेळ होता तो म्हणजे पिंपळाची पान गोळा करायची आणि खेळ खेळायचा 'ले मलाई बर्फ, ले मलाई बर्फ' असं ओरडत आम्ही खोटा खोटा कुल्फीवाला होत असू. पानाचं दुकान हाही आमचा आवडता खेळ होता. तेव्हा पिंपळाची पानचं आमच्या मदतीला यायची. त्यांनाच आम्ही खोटाखोटा कात-चुना लावून खेळातले विडे तयार करत असू.

माझं बालपण दिल्लीत गेलं. आम्ही दिल्लीतील 'रोशनआरा' या गल्लीत रहात असू. तिथे आम्ही मुलं वेळ मिळेल तेव्हा विटीदांडू, नाहीतर क्रिकेट खेळत असू. असा झाडांचा आमच्या आयुष्यात प्रवेश तर फार पूर्वीच झाला होता. झाडावर चढायचं, आंबे, पेरू, जांभळं तोडायचा तर आमचा छंदच होता. झाड म्हणजे आमची दोस्तमंडळीच! त्यातली बरीचशी झाडं माझ्याच वयाची होती. काही माझ्याहून मोठी तर काही लहान! आम्ही एकाच कुटुंबातले आहोत असे मला वाटे.

आज त्या झाडांची आठवण म्हणून मी छोटीशी बाग केली आहे. त्यातील झाडांकडे पाहताना माझ मन भूतकाळात उडून जातं आणि आठवण होते लहानपणीच्या एका जांभळाच्या झाडाची. त्या झाडाखाली आम्ही खेळलो, ते झाड म्हणजे आमच्या लहानपणीचा गारवा! त्या झाडाखाली आम्ही खेळलो लहानाचे मोठे झालो. एखाद्या वयस्कर व्यक्तीप्रमाणे ते झाड आम्हाला वाटत असे. त्या झाडाखाली माझी आई, शेजारच्या बायका बसायच्या. दुपारच्या वेळी उन्हाच्या झळा मारत तेव्हा आम्ही मुलं या झाडाच्या सावलीत गोटया खेळत असू. भर दुपारचं ऊन दिल्लीत धोकादायकच होतं. म्हणून घरची माणसं तेव्हा बाहेर पाठवायला तयार नसत. पण मग जांभळीच्या सावलीत खेळतोय असं कबूल केलं की, आई बाहेर पाठवत असे. जणू काही आजोबांजवळच खेळतोय, आहे त्याचं लक्ष असं निर्धास्त वाटत असे, त्या झाडाजवळ आम्हाला! ते झाड अतिशय पसरलेलं होतं. जणू काही दोन्हीकडे हात पसरून आशीर्वाद देत ते झाड उभं होतं!

आजही माझं नातं या झाडांशी आहे. पुष्कळ कविता लिहल्या आहेत मी झाडांवर! झाडांच्या संगतीत मी खुलतो. त्यांच्याजवळ मला खूप खूप शांत वाटतं. अमलतास, गुलमोहोर, बांबूचं वन,

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कडूनिंब असे अनेक वृक्ष प्रिय आहेत मला. बांबूच्या वनातला वारा 'सोंय सोंय' असा शीळ घालत येतो जणू काही तो 'साई साई' अस देवाचं नाव घेतो आहे असे वाटते. ही बांबूची झाडं ना खूप खूप वर्ष बांबू देतात हया बांबूच्या वनाचा नाश व्हायची वेळ येते तेव्हाच बांबूला फुलं येतात म्हणे!

कडुनिंबाच्या पांढऱ्या पिवळसर फुलांना पाहून कवी शैलेंद्र यांच गाणं आठवलं.

''मिला है किसी का झुमका ठंडे ठंडे हरे नीम तले!'' कडुनिंबाची पांढरी पिवळी छोटी छोटी फुले म्हणजे झुमकेच! (लोंबती कर्णफुलेच)

माझ्या घरासमोर छोटसं आवार आहे. दोन खुर्च्या मावतील एवढी हिरवळ मी तेथे मुद्दाम जोपासली आहे. फाटकाजवळ गुलमोहोर लावलाय, त्याच्याभोवती छोटसं कुंपण घातलं आहे. हे झाड मोठं होतांना याची विशेष काळजी घ्यावी लागते. आता ते खूप छान वाढलय. दरवर्षी लालेलाल मुकुट घालून त्याच्या फुलांच्या पऱ्या माझ्या अंगणात उतरतात.

माझ्याकडं एक झाड आहे. राखीने दिलेलं! बरेच दिवस झाले होते त्याला लावून. पण ते काही मोठं होत नव्हतं! आम्ही लक्ष देत होतो, खतपाणी घालत होतो, मग असं का? मग राखी म्हणाली ''नुसतं तेवढंच नाही त्या झाडाशी बोललं पाहिजे आमची बंगाली परंपरा आहे''. झाडांबरोबर बोलण्याची! त्याच्याशी बोललं पाहिजे, बोलला नाहीत तर ते कसं वाढेल? लहान मुलांसारखं असतं त्याचं!''

मग मी त्याच्याशी बोलू लागलो आणि खरोखरच ते झाड वाढू लागलं. आता तर छान विशाल वृक्षच आहे तो ! राखी अजून कधी आली तर त्याच्याशी बोलते. त्याच्यापाशी बसते. तो वृक्ष राखीचा आहे, तिने दिलाय म्हणून तो मला प्रिय आहे.

माझ्या बागेत एक मोसंबीच झाड आहे. तसच पांढऱ्या चाफ्याचही झाड आहे. चाफ्याचं झाड मोठं झालं की त्याची कुठलीही फांदी किंवा पान तोडलं की, तिथून दुधासारखा पांढरा चीक निघतो म्हणून त्या झाडाला मी 'बडी माँ' असं नाव दिलय. या झाडाची गंमत म्हणजे फुलं आली की, पाने गायब! आणि पानं येतात तेव्हा फुलांचा पत्ता नसतो तो पानाफुलांचा लपंडाव पाहतांना खूप मजा येते. वाटते बडीमाँच्या अंगाखांद्यावर त्या पानाफुलांचं बागडणं चालू असतं.

या बागेत मी पपया लावल्या आहेत. तीनवेळा फळ दिलं की हे झाड मरतं. जंगलातला पानगळीचा मोसम पहिलाय का कधी कुणी? पानं गळतात आणि आपला हिरवा रंग टाकून लाल पिवळ्या, केशरी रंगाची अशी काही उधळण करतात; की बघताना भान हरपून जातं. बहावा लाल, आणि चिनार वृक्षमंडळी आपल्या पहाडी भागात अशी रंगाची दाटी करतात की रंगीबीरंगी कपडे घालून ही कुठलीतरी वरातच चालली आहे! माझ्या बागेत एक बदामाचं झाड आहे. त्याची पान लाल होत होत माझ्या हिरवळीवर पडतात. मी गच्चीवरून पाहतो. तेव्हा चंद्रही पिवळसर केसरी झालेला. असं वाटलं की हा सुद्धा आता पिकल्या पानासारखा टपकन् माझ्या हिरवळीवर पडेल.

झाडं मला फार आवडतात. निसर्गावर मी पुष्कळ कविता लिहिल्या आहेत झाड चैतन्यशील असतात. नुसतं झाडांकडे पाहिलं तरी मन उल्हसित होतं. प्रवासाला निघताना मी पहाटेलाच निघतो. त्यावेळचा

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

निसर्ग मला मोहवून टाकतो. सूर्य उगवत असतो. पाखरांची सकाळ तर केव्हाच झालेली असते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अवती भवती असणारी झाड पाहता पाहता प्रवास कसा संपून जातो ते कळत नाही !

शब्दार्थ व टीपा : सांगाती - मित्र, सोबती

▪ उत्क्रांती - सावकाश होत जाणारा बदल ▪ निर्धास्त - निश्चिंत, काळजी न करता ▪ मोसम - ऋतू ▪ पार - कट्टा ▪ कुल्फी - काडीला लावलेल्या बर्फाचा गोड गोळा ▪ पुरातन - जुने ▪ रेणू - पेशी ▪ गारवा - थंड जागा ▪ परंपरा - रूढी, पद्धत ▪ भान हरपणे - स्वतःला विसरणे ▪ हिरवळ - मुद्दाम वाढविलेले मऊ गवत - लॉन ▪ चैतन्यशील - उत्साह, आनंद देणारी ▪ वावर - मोकळी जागा ▪ पानगळ - झाडांची पाने गळणे

टीपा :

| | | |
|---|---|---|
| ▪ राखी | - | सुप्रसिद्ध हिंदी अभिनेत्री, |
| ▪ शैलेंद्र | - | सुप्रसिद्ध हिंदी गीतकार, |
| ▪ बहावा | - | एक वृक्ष याला पिवळीधमक फुले लागतात, |
| ▪ अमलतास | - | याचे वृक्ष फार मोठे असतात यालाच 'घनबहिडा' असे म्हणतात. या वृक्षास काळीलांबट फळे लागून ती झाडावर लोंबत असतात |
| ▪ चिनार | - | थंड प्रदेशात आढळणारा सूचिपर्णी वृक्ष |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) पृथ्वीवर जीव केव्हा जन्माला आले?
(2) माणूस कोणाप्रमाणे आहे?
(3) पूर्वजांनी पिंपळाला कशाचे स्वरूप दिले आहे?
(4) लेखकाचे बालपण कोणत्या गल्लीत गेले?
(5) जांभळाचे झाड लेखकाला कशाप्रमाणे वाटते?
(6) झाडांच्या संगतीत लेखकाला कसे वाटते?
(7) बांबूच्या वनातील शीळ काय म्हणते असे लेखकास वाटते?
(8) बंगाली परंपरा कोणती?
(9) पांढऱ्या चाफ्यास लेखकाने काय म्हटले आहे?
(10) पपईचे झाड केव्हा मरते?
(11) बांबूला फुले केव्हा येतात?
(12) लेखक प्रवासास केव्हा निघतात?

## प्र.2 खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(1) आसपासच्या वातावरणामुळे माणसाचा .............. बदलतो.

(2) .............. चा प्रत्येक अवयव औषधीच्या रूपात आपल्या हाती येतो.

(3) पिंपळाभोवती .............. बांधतात.

(4) आम्ही सगळे ............... आहोत असे वाटते!

(5) जांभळाचे झाड म्हणजे .............. होय.

(6) आजही माझं .............. झाडाशी आहे.

(7) जणू काही तो .............. अस देवाचं नाव घेतोय असे वाटते.

(8) प्रख्यात कवी .............. यांचं गाणं आहे.

(9) कडुनिंबाची पांढरी पिवळी फुलं .............. प्रमाणे दिसतात.

(10) असा तो .............. लपंडाव पाहतांना खूप मजा येते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## प्र.3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) 'मनुष्य एक झाड' असे लेखकास का वाटते?

(2) लेखक व त्यांचे मित्र लहानपणी कोणकोणते खेळ खेळत?

(3) जांभळाच्या झाडाला लेखक गारवा का म्हणतात?

(4) लेखकाने गुलमोहोराची काळजी कशी घेतली?

(5) बांबूच्या झाडाला फुले केव्हा येतात?

(6) राखीने दिलेले झाड वाढत का नव्हते?

(7) पानगळीच्या मोसमात कोणती वरात चालते?

## प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) माणूस झाडासारखा असतो म्हणजे काय?

(2) जांभळाच्या झाडाबद्दल लेखकाच्या कोणकोणत्या आठवणी आहेत?

(3) चाफ्याच्या झाडाला लेखक ''बडी माँ'' का म्हणतात? त्याची गंमत कोणती?

(4) जंगलात पानगळीच्या दिवसात कोणते दृष्य दिसते?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''पुष्कळ कविता लिहल्या आहेत मी झाडांवर!''
(2) ''तो वृक्ष राखीचा आहे!''
(3) ''झाडं चैतन्यशील असतात.''

**प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.**

(1) या पाठात आलेल्या सर्व वृक्षांची वैशिष्टये सविस्तर स्पष्ट करा.

**भाषाभ्यास :**

**(1) खालील वाक्यातील अलंकार ओळखा लक्षणे लिहा.**

(1) झाड म्हणजे आमची दोस्तमंडळीच!
(2) जांभळाच्या झाडाजवळ खेळतांना जणू आजोबांजवळ खेळतोय असे वाटे!
(3) कडूनिंबाची छोटी छोटी फुले म्हणजे झुमकेच!
(4) चंद्रही पिकल्या पानासारखा टपकन् हिरवळीवर पडेल.

**उपक्रम :**

- श्रीकांत इंगळीकर यांच्या 'आसमंत' या पुस्तकातील ''बहावा जिवाभावाचा'', हा लेख वाचा.
- निरनिराळ्या झाडांची चित्रे जमा करुन त्यांची माहिती लिहा.
- या पाठात ''चेतनगुणोक्ती'' अलंकाराची अनेक उदाहरणे आली आहेत ती शोधून त्यातील सौंदर्य स्पष्ट करा.

**शुद्धलेखन :**

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| कातीव | जामीन | दीपावली |
| पुनीत | खरखरीत | अश्लील |

*****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ-8 : मेळघाटचे शिल्पकार

मृणालिनी चितळे

I1P8C7

परिचय :

मृणालिनी चिंतामणी चितळे (1957) यांची एकूण 18 पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांत कथासंग्रह, शब्दांकन, मोठ्यांसाठी आणि छोट्यांसाठी नाटुकली यांचा समावेश आहे. त्यांच्या कर्ताकरविता या संपादित पुस्तकाला राज्य पुरस्कार मिळाला आहे. मेळघाटावरील मोहर या पुस्तकासही दोन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या पुस्तकाची सातवी आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे. त्यांच्या सामाजिक आणि संस्कृतिक कार्याची दखल घेऊन पुणे महानगर पलिकेने त्यांचा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. महर्षी कर्वे शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळावर 12 वर्षे त्यांनी काम केले आहे.

## डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे

उच्च विद्या संपादन करुनही सातपुड्याच्या अतिदुर्गम प्रदेशात वसलेल्या बैरागड या भागात राहून सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेनं ते दोघे कार्य करीत आहेत. दारिद्र्यानं पोखरलेलं, आजारानं ग्रासलेलं, अज्ञानानं पिचलेलं गांव त्यांनी दत्तक घेतले. तिथे कोणतीही संस्था न उभारता प्रबोधनाच्या वेगळ्या वाटा त्यानी शोधल्या. शिक्षणातून, उत्सवातून, कधी कोर्ट कचेरीचा हिसका दाखवत ते काम करत राहिले. ते शेतीच्या प्रयोगात शिरले, धर्मांन्तराच्या प्रश्नांना भिडले. या त्याच्या कार्याचा गौरव म्हणून I.B.N. लोकमतचा 'महाराष्ट्रीयन ऑफ दि इयर' तसेच महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचा 'बाया कर्वे' पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

(मूल्य - सामाजिक बांधिलकी)

गावातून जात असताना कोपऱ्यावरच्या पानाच्या टपरीपाशी एक तरूण पाठमोरा उभा असलेला डॉक्टरांना दिसला. जिनची पँट, पूर्ण बाह्यांचा शर्ट, डोळ्यावर गॉगल. त्या तरुणाच्या हातात गुटक्याचे पाकिट होतं. तो गुटका आवासून तोंडात टाकताना त्याला समोर डॉक्टर दिसले. त्यानं गुटखा खिशात टाकला आणि डॉक्टरंना नमस्कार केला. डॉक्टर म्हणाले अरे, बाबू तुझी तब्येत केवढी तरी उतरली, काय करतो रे? कुठे असतोस? यावर तो कसंनुसा हसंला. यावरून तो काहीच करत नसणार हे त्यांनी हेरले. अशी अर्धवट शिक्षण सोडून रिकामी बसलेली पोंर त्यांना अधूनमधून भेटायची.

अशा आसपासच्या चाळीस एक गांवामधील घराघरात जाऊन मुलांच्या आईवडिलांनी मुलांना शाळेत पाठवावे म्हणून त्याना अक्षरशः गळ घातली होती. त्यावेळी त्यांच्या आईवडिलांच्या मनात अनेक प्रश्न असत. मुल शाळेत गेली तर गुराढोरांचे कोण बघेल? शेतात कोण राबेल? स्वयंपाकपाणी कोण बघेल? या त्यांच्या प्रश्नांना त्यांना पटतील आणि रुचतील अशी उत्तरे सध्यातरी डॉक्टरांपशी नव्हती शिवाय लिहितावाचता येण्याने त्यांच्या रोजचा पोटापाण्याचा प्रश्न सुटेल असं आश्वासनही ते देऊ शकत नहते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

स्वतः डॉक्टरांना शिक्षणाचं महत्व पटल होतं. शिक्षणामुळे माणसामध्ये परिपक्वता यायला मदत होते जगात काय चालले आहे या विषयी माहिती मिळते आणि वेगवेगळ्या संधी उपलब्ध होऊ शकतात याची त्यांना खात्री होती. निदान प्रत्येकाने एका मुलांला तरी शाळेत पाठवावं असा आग्रह त्यांनी धरला. त्यांच्या प्रयत्नाना यश येऊंन 1988 सालनंतर अनेक मुलं आश्रम शाळेत भरती झाली. शाळेत गेल्यामुळे त्यांच्या आचारविचारात काही बदल अपेक्षित होता. तो मात्र घडताना त्यांना दिसला नाही. काही मुलं नापासाचा शिक्का घेऊन माघारी आली. जी ऊत्तीर्ण झाली ती जेमतेम 35/40 गुण मिळवून. त्यामुळे महाविद्यालयात प्रवेश घेण्यास त्या गुणांचा कांही उपयोग नव्हता. शिक्षणाचं वारं लागलेल्या त्या नवीन पिढीमध्ये डॉक्टरंना नवचैतन्याऐवजी कमालीचं नैराश्य आणि मरगळ जाणवत होती. शिकल्यामुळे शेतात काम करायची तर लाज वाटत होती आणि शिक्षणाच्या जोरावर अर्थार्जन करण्याची क्षमताही वाढली नव्हती. बदल झाला होता तो फक्त त्यांच्या बाहय पोशाखात, अर्धी चड्डी आणि गंजीफ्रॉक अशा वेशात फिरणारी मुलं जिनची पँट, पूर्ण बाह्याचा शर्ट एवढंच नाहितर तोंडात गुटखा आणि डोळ्यावर गॉगल लावून हिंडायला लागली होती. शहरात कुठं तरी तात्पुरत्या स्वरूपाची मोलमजुरी करून चैन करायला शिकली होती.

या सगळ्याला आपली शिक्षण पद्धती, शिक्षकांची शाळेतील अनुपस्थिती, पाठ्यपुस्तकांची भाषा, मुख्य म्हणजे जीवनाभिमुख आणि मूल्यशिक्षणाचा अभाव यासारख्या कितीतरी गोष्टी जबाबदार आहेत हे डॉक्टर जाणून होते. परंतू हे बदल घडवून आणणं एकट्यादुकट्याचं काम नाही आणि ते लगोलग होणार नाही हेही ते समजून होते. यासाठी डॉक्टरांनी आपल्या सहचारिणी डॉ. स्मिता कोल्हे यांच्याशी चर्चा करून संस्था न काढता काम करायचं या विचारावर दोघांची एकवाक्यता झाल्यामुळे जिथं आणि जशी गरज निर्माण होईल तस ते काम करत राहिले. हे काम करताना गावातल्या लोकांच्या मूलभूत गरजा, त्यांच्या अडचणी, त्यांची होणारी पिळवणक, ती दूर करण्यासंबंधीच्या उपाय योजना या सर्व विषयातील बारकावे त्यांच्या लक्षात येऊ लागले. ते जाणून घेताना त्यांनी अक्षरशः आपल तनमनधन पणाला लावलं. प्रबोधनाचा विचार करताना शिबिरांची कल्पना त्यांच्या मनात डोकावली, फक्त ही शिबिर सरसकट गावातल्या सर्वांसाठी न घेता फक्त तरुणांसाठी घेतली तर ती अधिक उपयुक्त ठरतील अस त्यांना वाटलं विचार पक्का झाल्यावर 1997 सालापासुन तरूण मुलांच्या प्रशिक्षणार्थ त्यांनी शिबिर आयोजित करायला सुरुवात केली. आजूबाजूच्या गावातील 18 ते 20 वयोगटातील 30/35 मुलं शिबिरात सहभागी होऊ लागली. त्यांना शिकविणारे शिक्षक बाहेरगांवाहून आले असल्यामुळे आदिवासी वातावरण व परिस्थीतीशी जुळवून घेताना त्यांची चिडचिड व्हायची. पिढ्यानपिढ्या अक्षरशत्रू असलेल्या आदिवासींच्या मुलांना शिकविण्याचा कळवळा त्यांच्यापाशी नसायचा. म्हणून 'ये आदिवासी कभी नही बदलेगा' असा त्यांचा दृष्टीकोन असायचा. बरोबर याऊलट दृष्टीकोन या शिबीराची आखणी करताना डॉक्टरांनी ठेवला होता.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिबिराद्वारा शेती, आरोग्य, पर्यावरण आणि शासकीय या चार विषयांची ओळख मुलांना तीन दिवसांत करून देत. प्रत्येक विषयाचा संबंध मुलांच्या दैनंदिन जीवनाशी जोडून दाखवणं हा या शिबिरा-मागचा मुख्य उद्देश होता. पहिला दिवस शेतीविषयक प्रश्नांचा असायचा. शास्त्रोक्त पद्धतीनं शेती केली तर ती फायदेशीर ठरते हे ते आपल्या अनुभवाने प्रात्यक्षिकांसह दाखवून देऊ शकत होते.

आरोग्य या विषयात आहार आणि आजार हे दोन विषय त्यांनी समाविष्ट केले होते. कुपोषण टाळण्यासाठी योग्य आहार म्हणजे काय? त्याच बरोबर स्वच्छ पाणी आणि लसीकरणांच महत्त्व, आजारी माणसानं रिकाम्या पोटी औषधं घेतली तर होणारे औषधांचे दुष्परिणाम अशा अनेक विषयांवर ते प्रबोधन करीत.

पर्यावरण या विषयाचं महत्त्व पठवून देताना ते सांगत की या जंगल संपत्तीचे खरे मालक तुम्ही आहात कारण आत्तापर्यंत तुमच्या वाडवडिलांनी त्याचं संवर्धन आणि संरक्षण केलं आहे. शहरवासीयांना या नैसर्गीक संपत्तीची अपूर्वाई वाटते. येथील शुद्ध हवेचं अप्रूप वाटतं. म्हणून हजारो रूपयें खर्च करून ते इथं यायला धडपडतात. तेव्हा तुम्ही शहरात जाऊन पैसे मिळविण्यासाठी धडपड करण्यापेक्षा जे तुमचं स्वतःच आहे त्यामधून पैसे कसे मिळवता येतील इकडे लक्ष दिलं पाहिजे.

शिबिराचा तिसरा दिवस असे तो शासकीय योजनासंबंधीचा. शासनानं आदिवासी भागातील दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या समाजासाठी अनंत योजना आखल्या आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. परंतु अनेक वेळा या योजनांची माहिती संबंधिताना नसे. या शिबिरामधून त्यांनी या कर्मचाऱ्यांची जागरूकता निर्माण करून दिली. तसेच या योजनांची माहिती असलेल्या शासकीय कर्मचायांची व्याख्याने ते आयोजित करत. त्यातील बारीकसारीक तपशील समजावून सांगत. जातीचा दाखला देण्यासारख्या छोट्याछोट्या गोष्टींसाठी पटवारी जर दहा वीस रुपये मागत असेल तर त्याला विरोध करून पैसे उकळण्याच्या सरकारी वृत्तीला आळा घालण्यासाठी मुलांच नैतिक धैर्य कसं उंचावता येईल याकडे लक्ष देत. याबरोबच मुलांनी घेतलेल शिक्षण आणि शासकीय योजना यांचा संबंध जोडताना मुलांमधील आत्मविश्वास कसा वाढेल यावर ते भर देत.

शिबिरातून व्यवहार ज्ञान मिळवून आलेली तरुण मुलं गावासाठी काम करायला लागल्यामुळे गावाच्या दृष्टीनं ती उपयोगी माणसं ठरायला लागली. दाखला देण्यासाठी पटवाऱ्यानं 10/20 रुपये मागितले तर विरोध करण्याचं धाडस तरूण मुलं दाखवू लागली. ज्यांना लिहिता वाचता येत नाही अशा लोकांना सर्व सोयी-सवलती, योजना यांची माहिती देण्याचे काम ही तरुण मंडळी करू लागली.

या शिबिराचा अजून एक अदृश्य परिणाम म्हणजे त्यामधून जवळजवळ पाचशे कार्यकर्ते तयार झाले आहेत. त्यामुळे मेळघाटात कार्यकर्त्यांची एक फळी उभी राहू शकली आहे. या कार्यकर्त्यांनी आसपासच्या गावी जाऊन शेतीविषयक प्रयोग सुरू केले. विशेष म्हणजे सरकार शेतीसाठी किती प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देतं, त्याचे हप्ते कधी भरायचे, यासर्व गोष्टींची माहिती ही मुलं

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

शेतकऱ्याना करून देत. ही माहिती नसल्यामुळं इतर ठिकाणी शेतकरी कर्ज माफ होण्याची वाट बघत बसतात. कर्जाचा बोजा वाढला की नव्यानं कर्ज मिळू न शकल्यानं आत्महत्येला प्रवृत्त होतात. अमरावती या मेळघाटच्या जिल्ह्यात सर्वाधिक प्रमाणांत शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. पण हे लोण मेळघाटपर्यंत पोचू शकलं नाही याचं श्रेय अन्य काही कारणांइतकेच डॉ. कोल्हे यांनी गेली पंधरा वर्ष सातत्यानं चालू ठेवलेली शिबिरे त्यातून जागरुक झालेला तरूण वर्ग, यांना दिलं तर ते वावगं ठरू नये.

## शब्दार्थ व टीपा :

▪ रुचतील - आवडतील ▪ परिपक्वता - पूर्णता ▪ नवचैतन्य - नवीन चेतना ▪ मरगळ - कोमेजणे, नैराश्य ▪ क्षमता - सामर्थ्य ▪ जीवनाभिमुख - जीवनाला सामोरे आसणारे ▪ प्रात्यक्षिक - प्रत्यक्षात एखादी गोष्ट करणे ▪ लसीकरण - लस देणे ▪ संवर्धन - वाढविणे ▪ अपूर्वाई - नवलाई ▪ पटवारी - पट्टेवाला ▪ अर्थार्जन - पैसे मिळविणे

## स्वाध्याय

### प्र 1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

(1) टपरीपाशी उभ्या असलेल्या तरुणाच्या हातात कोणते पाकीट होते?

(2) डॉक्टरांनी त्या मुलाला कोणता प्रश्न केला?

(3) पँट शर्ट घालणाऱ्या मुलाला काय म्हणतात?

(4) डॉक्टरांच्या सांगण्यामुळे मुले कोणत्या शाळेल भरती झाली?

(5) शाळेल जाऊन मुलांनी किती मार्क मिळविले?

(6) शहरात जाऊन मुलांनी कोणता पोशाख स्वीकारला?

(7) शिबिरं कोणासाठी घ्यावीत असे डॉक्टरांना वाटले?

(8) कोणत्या वयोगटातील मुलं शिबिरात दाखल झाली?

(9) शिक्षणामुळे माणसांमध्ये कोणता बदल होतो?

(10) डॉक्टरांनी संस्था न काढता काम करण्याविषयी कोणाशी चर्चा केली?

### प्र 2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(1) अरे...... तुझी तब्येत केवढी तरी उतरली.

(2) मुलं शाळेत गेली तर...... कोण बघेल.

(3) शिक्षणामुळे माणसांमध्ये..... यायला मदत होते.

(4) त्यांनी अक्षरशः आपलं... पणाला लावल.

(5) आदिवासी वातावरण व परिस्थितीशी जुळवून घेताना त्यांची.... व्हायची.

(6) या कार्यकर्त्यांनी आसपासच्या गावी जाऊन.... प्रयोग सुरू केले.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

प्र 3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) आई बाबा मुलांना शाळेल का पाठवित नसत?

(2) आदिवासी आईबाबांच्याकडे डॉक्टरांनी कोणता आग्रह धरला?

(3) डॉक्टरांनी कोणासाठी शिबिर घेण्यास सरुवात केली?

(4) पर्यावरण या विषयाचं महत्त्व डॉक्टर कसे पटवून देत?

(5) डॉक्टरांनी सुरू केलेल्या शिबिराचां उद्देश कोणता होता?

प्र 4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) शिक्षणामुळे मुलांच्यात कोणता बदल झाला होता?

(2) टपरीपाशी ऊभ्या असलेल्या मुलाचे वर्णन डॉक्टरांनी कसे केले आहे?

(3) शिबिर घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत?

प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा

(1) मुल शाळेल गेली तर गुराढोरांचं कोण बघेल?

(2) परंतु हे बदल घडवून आणण एकट्या दुकट्याच काम नाही.

(3) 'ये आदिवासी कभी नही बदलेगा'.

प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.

(1) डॉक्टरांनी शिबिरामध्ये कोणकोणत्या गोष्टींची माहिती दिली?

(2) या शिबिराचा अदृश्य परिणाम कोणाता होता?

भाषाभ्यास:

विरुद्धार्थी शब्द लिहा

उत्तीर्ण, उपयुक्त, जागरूक, नैराश्य

उपक्रम

- मेळघाटातील मोहर हे मृणालिनी चितळे यांचे पुस्तक मिळवून वाचा.
- तुमच्या जवळच्या जंगल भागातील उपेक्षित लोकांचे जीवन जाणून घ्या.
- प्रकाश आमटे यांच्यावरील चित्रफीत पहा.

शुद्धलेखन

पुढील शब्द असेच लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| सुशिक्षित | शिष्यवृत्ती | वसतिगृह | निर्विघ्न |
| प्रदूषण | निष्कारण | संकल्पना | दुष्परिणाम |

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ-9 : वाटणी

रा.रं. बोराडे

L1M3N4

परिचय :

रावसाहेब रंगराव बोराडे (1940) यांच्या कथा ग्रामीण जीवनावर आधारलेली आहेत. ग्रामीण जीवन, ग्रामीण व्यक्तिरेखा. व त्यांचा व्यथा याचे सुरेख चित्रण त्यांच्या कथांतून येते. ग्रामीण जीवनातील उणिवा, तेथील दारिद्रय याबद्दल त्यांना वाटणारी खंत ठिकठिकाणी जाणवते. त्यांची भाषा ग्रामीण मातीत जन्मली व वाढली आणि त्यामुळे त्या भाषेतील सर्व लकबी, त्यातील रांगडेपणा तसाच गोडवा त्यांच्या कथात आढळतो. म्हणूनच त्यांची कथा मनात घर करून राहते. त्याचे 'माळरान', 'बोळवण', 'मळणी' इ. कथा संग्रह प्रसिद्ध आहेत. 'मळणी' या कथासंग्रहाला व 'पाचोळा' या लघुकादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळालेला आहे.

'वाटणी' ही ग्रामीण कथा त्यांच्या 'मळणी' या कथा संग्रहातून घेतली आहे. वाटणी हा नित्य जीवनातील प्रसंग यात आश्चर्य असे काही नाही. पण निर्जीव मालमत्तेबरोबरच आईबापांची वाटणी करण्याचा करूण प्रसंग या कथेत वर्णिला आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



(मूल्य - सामाजिक समस्या)

काठीच्या आधारानं अंगाचा तोल सावरीत गणातात्या वाडयाच्या पायऱ्या चढले. तेवढयानंही त्यांना अतिशय दमल्यासारखं वाटू लागलं. विशेषतः खोकल्याची उबळ खाली बसावयास भाग पाडते

की काय; अशी त्याना भीती पडली पण तसं झालं नाही. खोकल्याची ती उबळ तेवढयावरचं दबली, त्यांना थोडं बरं वाटलं. काठीवरचा भार त्यांनी अधिकच वाढविला. लटलटणारी पावलं काठीला जखडीत ते चालू लागले. स्वतःच्या चालण्यावर आता आपला ताबा आलेला आहे असं दिसताच त्यांनी समोर पाहिलं. उसाच्या चोथऱ्यावर माशा बसाव्यात त्याप्रमाणं ओसरीवर माणसं बसली होती. गणातात्यांची चाहूल लागताच सर्वांच्या नजरा तिकडं वळल्या. असं काही घडेल याची त्यांना कालच कल्पना आली होती. त्यामुळे ओसरीवर माणसं जमल्याचं किंवा त्यांचा नजरांचं त्यांना काहीच वाटलं नाही. जणू काही आपण त्या गावचेच नाही असं दाखवीत ते ओसरीवर आले आणि एका बाजूला बसून राहिले. सर्वांच्या नजरा लेप दिल्यावानी आणखीही त्यांना चिपकलेल्या होत्या ते काही तरी विचारतील, कोंडलेल्या बोलण्याला वाट फुटेल असं सर्वांना वाटत होतं. पण तसा अंदाज दिसेना तेव्हा देवबा पाटील म्हणाले.

''तात्या, पोरं वाटणी करायची म्हणायलेत''

गणातात्यांनी नजर उचलली, स्थिर नजरेनं सर्वांना न्याहाळलं. आखाडयात उतरल्यावानी दोघं भाऊ एकमेकांकडं पाहात बसले होते. थोरल्याची बायको दाराच्या आतील भागात उभी होती. धाकटीनं कणगीचा आडोसा घेतला होता. तिची नजर मात्र सारखी भिरभिरत होती तात्याची बायको पोतेरा फेकावा तशी एका कोपऱ्यात बसली होती तिची मान सारखी हालत होती. एका पायाचा गुडघा तिनं उभा केला होता व त्याच्या भोवती दोन्ही हातांची माळ तिनं टाकली होती. ओसरीवर चाललेल्या प्रकाराशी तिचा काही संबंध आहे असं तिच्या चेहऱ्यावरून वाटत नव्हतं. त्यांनी हे सारं पाहून घेतलं. गोष्टी कोणत्या थराला आलेल्या आहेत याचा अंदाज केला. वाटणीचा हा घोळ गेल्या सहा महिन्यापासून घरात चालू होता. घरातल्या कटकटी अधिकच वाढत होत्या. कधी शेतातली कामं खोळंबून राहत होती तर कधी चूल बंद पडत होती. आठ दिवसांपासून तर घरातली धुसफूस अधिकच वाढली होती. यापेक्षा वाटण्या होणं अधिक चांगलं; असं त्यांचं मत बनलं होतं आणि म्हणूनच ते म्हणाले.

''करायचं तर करा म्हनावं वाटण्या. त्येंच्याच मनात तसं असल्यावर म्या तरी काय करणार?''

''तस्या वाटन्या झाल्यात तात्या, फकस्त सवाल हाये तो तुम्हा दोगांचं कसं करायचं?''

''मला काय विचारताव, कसं करायचं ते तुमाला कळत न्हाई का?''

गुरकावल्यानी धाकटा म्हणाला 'आमाला मोप कळतं, पर तुमच्या मनात काय हाय ते सांगा की अगोदर'

''तीन वाटन्या करा साऱ्याच्या, दोगा भावांच्या वाटन्या आन् आमा नवरा बायकोची एक वाटणी...''

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्यांचं बोलणं संपण्याच्या आतच धाकटा म्हणाला, ''ते न्हाई जमायचं, मुळातच लंगोटीभर जमीन मिळवून ठेवलीया त्यात बी तीन वाटन्या करायाच्या म्हनल्यावर खाली काय ऱ्हायलं''.

गणातात्या व्यथित झाले. हा घाव त्यांच्या जिव्हारी झोंबला. धाकटयानं लंगोटीभर जमिनीचा अनेकदा उल्लेख केला होता. वस्तुतः सत्तावीस एकर जमीन म्हणजे आजच्या काळात कमी नव्हती. शिवाय त्यातली निम्म्याच्यावर जमीन गणातात्यांनी स्वतः कमावलेली होती त्यासाठी त्यांनी कष्टांची तमा बाळगली नव्हती. किंवा कधी हौसमौज केली नव्हती. असं असताना धाकटयानं त्यांचा असा हेटाळणीने उल्लेख करावा हे त्यांना मुळीच आवडलं नाही. उसळून ते बोलले.

'म्या मोप लंगोटीभर मिळविली, पर तुम्ही किती मिळवितात ते बघू की आता'.

हा विषय अधिक वाढू नये म्हणून देवबा पाटील म्हणाला.

''तात्या, उगं का 'शिळ्या कढीला ऊतं आनतावं?' आपल्या म्होरं काय वाढून ठिवलंय बगा की आगोदर''.

''म्या आनला का शिळ्या कढीत ऊत? जवा तवा हा आसंच बोलतो, आमचं काय आता झालं गेलं, पर ह्येन दावावं कमवून मग बोलावं आमाला'' ''कस्याला उगं ते उगळीत बसताव, वाटन्याचं काय करायचं ते सांगा अगोदर''.

''काय करायचं ते तुमाला कळत न्हाई का? करायच्या तर तीन वाटन्या करा. ह्या दोघा भावांच्या दोन वाटन्या आन् आमची तिसरी वाटणी''

धाकटा ताबडतोब उसळला म्हणाला, ''ते न्हाई जमायचं. तीन वाटन्या केल्यावर ऱ्हायलच काय आमाला? झालंच तर लेकाच्या बरोबरीनं वाटनी मागायला तुमाला तरी बरं दिसंत का?''

गणातात्यांचा चेहरा रागानं ताठरला. धार चढलेल्या आवाजात ते म्हणाले.

''लेकाच्या बरोबरीनं वाटनी मागनं मला बरं दिसत न्हाई हे खरं, बाप जिता हाय तवर वाटन्या करनं तुमाला बरं दिसतं का?''

थोरला इतका वेळ खाली मान घालून बसला होता, हातातल्या अडकित्त्यानं नखं खरडीत होता.

गणतात्यांनी असं सांगताच तो म्हणाला.

''ते एक खरं झालं तात्या. पर वाटनी घेऊन तुम्ही काय करनार हाय? तुमाला ना कस्ट व्हायचे न्हाईत, ना सोता कामधंदा यायचा न्हाई, मग दुसऱ्याची भरती काय म्हणून करतावं?''

''मंग मनात तरी काय हाय तुमच्या? दोन वाटन्या करून आमची काय सोय लावायचा इचार हाय तुमचा?''

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

''आमी काय तुमाला उघडयावर पडा म्हनलं न्हाई. तुमी एक जनाकडं ऱ्हावा, माय एकजनाकडं ऱ्हाईल''.

''म्हंजी आमच्याबी वाटन्या करायच्या म्हना की. चांगलं हाय बाबा. जलम दिलेला पांग फेडला आमचा. लई बरं वाटलं आयकून''.

''काही तरी विशेष बाब सर्वांना समजावून द्यावी त्याप्रमाणे धाकटा बोलला'' आसच हाय बगा तात्यांचं आमी एकादी गोष्ट करायला जावी तर तात्याला त्येत लगेच वाकडं दिसतं करायचं तर कसं आमी ?

तात्या संतापानं भडकले. रागानं थरथरत म्हणाले, ''काय वाकडं दिसल रं तुला? जलम दिलेल्या मायबापाच्या वाटन्या करायला निगालाव. ह्या हातावरलं त्या हातावर झेललं तुमाला, पर त्याच हाताची फारकत करायला निगालाय!''.

तात्यांना खोकल्याची उबळ आली. प्रयत्न करूनही त्यांना उबळ आवरता येईना. हैराण झाल्यागत त्यांची अवस्था झाली. दोघाही भावांच्या चेहऱ्यावर त्रासिकपणा पसरला. जावाजावांनी तोंड फिरविली. तात्यांची पत्नी अस्वस्थ झाली. तिची बुबळं हलू लागली. अखेर तिला बसवेना. एका हातात तिनं राख घातलेली झाकणी घेतली व पायावरून मोटारीचं चाक गेलेल्या कुत्र्यावानी खुरडत ती तात्यांच्या जवळ आली. छातीतला बेडका तात्यांच्या तोंडात आला. झाकणीच्या राखेवर तात्यांनी तो बेडका टाकला. तेवढयानंच त्यांचा जीव घाबराघुबरा झाला. त्यांच्या चेहऱ्यावर घामाचा थर उमटला. छाती मोकळी होताच त्यांना बरं वाटलं. विलक्षण थकवा आल्यावानी ते बसून राहिले. तात्यांची पत्नी पुन्हा खुरडत निघाली. डोळे मिटून आपल्या जागेवर बसून राहिली.

थोडा वेळ कुणीच काही बोललं नाही. आता आपणचं बोललं पाहिजे असं वाटून देवबा पाटील म्हणाला.

''तात्या, दोगा लेकाकडं ऱ्हायलाच म्हंजी आपली बी वाटनी झाली आसं कसं तुमी समजीताव?''

आपलाच हेका चालविणं फारसं चांगलं नाही आणि आपण कितीही हेका चालविला तरी आपले हे दोघही लेक तो मुळीच चालू देणार नाहीत हे लक्षात घेत गणतात्या म्हणाले.

''बगा बाबा, तुमच्या ध्यान्याला यील तसं करा आमी काय आता नसल्यातच जमा झालावं''

तात्या असं बोलले तेव्हा सर्वांनाच समाधान वाटलं. आता उरलेल्या गोष्टीचा तडकाफडकी निकाल लावावा म्हणून देवबा पाटलानं विचारले.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

'मग कसं सोपानराव, तुमी तात्यानला संबाळताव का काकूनला संबाळताव?'

थोरला घाईघाईनं म्हणाला,

''तात्यानला संबाळतो की म्या, एव्हडं त्येनी माज्यापायी केलं तर संबाळायला ते काय जड हायीत का मला?''

इतका वेळ तोंडाला मिट्टी मारून बसलेली धाकटयाची बायको म्हणाली,

''व्हय की तुमाला कुटले ते जड व्हायला. शेताची राखण करीत ते रातदिवस रानात पडलेत न्हवं का. एक गडी आयताच वाचतो. आणि ती नवऱ्याकडं वळून म्हणाली, ''तुमी काय आयकू नका वं त्येंचं. रांगत्या लेकरावानी आत्याबायचं बगावं लागतं, माज्यानं काय ते बगनं व्हायचं न्हाई. म्या माज्या लेकराबाळांच करीत बसू का आत्याबायचं करीत बसू?''

थोरली ही तिच्यावर तडकली, म्हणाली.

''तुमाला करायचं न्हाई तर मग म्या तरी कस्याला करू? म्या तरी काय गुत्तं घेतलंय का आत्याबायचं करायचं?''

''मंग त्येंच्याबी करा वाटन्या. सा सा म्हयने घ्या फोडून. ज्येंच्याकडं ह्या सा म्हयन्यात मामासाब आसतेल त्यांच्याकडं लगेच दुसऱ्या सा म्हयन्यात आत्याबाय. तुमालाबी तो सोस नग की आमालाबी तो सोस नगं''

दोघा जावांचं बोलणं डागण्या दिल्यावानी गणातात्यांना झोंबत होतं. त्यांचं मस्तक बधीर झालं होतं. असं काही ऐकण्याची आपल्यावर वेळ येईल असं त्यांना कधीच वाटल नव्हतं. गणातात्यांनी बायकोकड पाहिलं. तिचा चेहरा बोहरला होता. तिची मान अधिकच वेगानं हालत होती व डोळ्यातून पाण्याचे थेंब ठिबकत होते. गणातात्या व्यथित झाले. बाजूला पडलेली काठी त्यांनी हातात घेतली. तिच्यावर सारा भार टाकीत ते उठले. त्यांना उठताना पाहून देवबा पाटलानं विचारलं.

''कुठं निगालावं तात्या?'' अवसान गेल्यागत तात्या म्हणाले, ''पडतो जरा तिकडल्या खोलीत''.

वाटन्याचा शेवट करूनच मगं जायचं व्हतं. आमालाबी हलायला बरं पडलं असतं''

''आता बसलाच हाव तर करा की वाटन्या''.

''वाटन्या काय आता झाल्यातच जमा हायीत. फकस्त तुमचं कस करायचं ते सांगा''.

एक खोल निःश्वास टाकीत गणतात्या म्हणाले, आमाला वाटनी नगं का दोन जागी दोगांनी ऱ्हानं नगं. आमी नवरा-बायकू एक जागीच ऱ्हानार हाय.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

''मग पोटापान्याचं कसं करताव?''

''द्यावी वाटली तर सालाची आडसीरी द्यावी, न्हायतर खाऊ मोलमजुरी करून''.

इतकं बोलून काठीवर भार टाकीत गणातात्या खोलीच्या दिशेने चालू लागले. आणि चकित झाल्यागत सगळे त्यांच्याकडे पाहात राहिले. म्हातारीच्या भिजलेल्या बुबुळावर मात्र अश्रूंचा दाट पडदा सुटला होता.

## शब्दार्थ व टीपा :

▪ उबळ - ठसका ▪ अंदाज - अदमास ▪ ओसरी - सोपा, पडवी ▪ आखाडा - कुस्ती खेळण्याची जागा ▪ वाटणी - विभागणी (वडिलांच्या मालमत्तेची विभागणी) ▪ कणगी - धान्य ठेवण्याची वेताची उंच टोपली ▪ घोळ - घोटाळा ▪ फकस्त - फक्त ▪ सवाल - प्रश्न ▪ धुसमुस - आतल्या आत येणारा राग ▪ दरडावणे - भीती दाखविणे ▪ व्यथित - दुःखी होणे ▪ जिव्हारी झोंबणे - मनाला लागणे ▪ निमा -अर्धा ▪ तमा - काळजी ▪ हौसमौज - इच्छापूर्ती ▪ हेटाळणी करणे - तिरस्कार करणे ▪ शिळ्या कढीला ऊत - गतकाळातील गोष्टी उकरून काढणे ▪ जिता - जिवंत ▪ माय - माता ▪ लई -फार ▪ पांग फेडणे - उपकार फेडणे ▪ संतापान भडकणे - रागाने चिडणे ▪ हैराण होणे - बेजार होणे ▪ जीव घाबराघुबरा होणे - भीती वाटणे ▪ थकवा - दम लागणे ▪ तडकाफडकी - अचानक ▪ निकाल - निर्णय ▪ आयता - सहजच ▪ गुत्ता घेणे - ठेका घेणे ▪ डागण्या देणे - चटके देणे ▪ मस्तक बधिर होणे - डोके सुन्नं होणे ▪ चेहरा बोहरणे - चेहरा काळवंडणे ▪ अवसान जाणे -धीर नाहीसा होणे ▪ आडसरी - धान्य मोजण्याचे जुने माप, 2 किलो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) तात्याच्या घरी पंचमंडळी का जमली होती?

(2) दोघे भाऊ एकमेकांकडे कसे पाहात बसले होते?

(3) तात्यानी किती वाटण्या करण्यास सांगितल्या?

(4) धाकटयानं तात्यांच्या जमिनीचा कोणत्या शब्दात उलेख केला?

(5) तात्यांच्या कोणत्या बोलाने सर्वांना समाधान वाटले?

(6) दोघा जावांचं बोलणं गणातात्यांना कसे झोंबत होते?

### प्र.2 खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(1) काठीच्या आधारानं अंगाचा तोल सावरीत .............. वाडयाच्या पायऱ्या चढले.

(2) तात्याची बायको .............. फेकावा तशी एका कोपऱ्यात बसली होती.

(3) ऊसाच्या चोथऱ्यावर माशा बसाव्यात त्या प्रमाणं ............. वर माणसं, बसली होती.

(4) वाटणीचा हा घोळ गेल्या ............... महिन्यापासून घरात चालू होता.

प्र.3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) गणातात्याना कोणत्या गोष्टीची कल्पना आली होती?
(2) वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते?
(3) तात्यांनी किती एकर जमीन कशी कमवली होती?
(4) मुलांनी आईबापांबद्दल कोणता निर्णय घेतला होता?

प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) तात्यांना धाकटया मुलाचा का राग येत होता?
(2) तिसरी वाटणी कुणी मागितली? का?

प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''तात्या उगं का शिळ्या कढीला ऊत आनताव.''
(2) ''म्या तरी काय गुत्तं घेतलय का''?
(3) ''मंग पोटापान्याचं कसं करताव''?

प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.

(1) तात्यांच्या घरात धुसफूस का वाढली होती? त्यावर त्यानी कोणता उपाय सुचविला?
(2) शेवटी गणातात्यांनी कोणता निर्धार व्यक्त केला? का?

भाषाभ्यास :

(1) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

जिव्हारी झोंबणे, हेटाळणी करणे, शिळ्या कढीला ऊत येणे,
गुत्तं घेणे, पांग फेडणे

खालील शब्द आजच्या मराठीत लिहा.

तस्या, फकस्त, म्या, मोप, जवातवा, कश्याला, मागनं, मंग, जलम, आमी तुमी, न्हाय

उपक्रम :

- ''वाटणी एक शाप'' या विषयावर चर्चा करून निबंध लिहा.
- ''एकत्र कुटुंब योग्य की अयोग्य'' या विषयावर चर्चा करा.

शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| वीरश्री | विसविशीत | अशुभ |
| बहिष्कृत | प्रतिष्ठित | उद्धार |

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ-10 : क्रांतिज्योती सावित्रीबाई

सुषमा देशपांडे

Z8C9K9

परिचय :

सुषमा प्रभाकर देशपांडे (1955) या मूळच्या प्रायोगिक रंगभूमीच्या कलाकार आहेत. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर संशोधन करून त्यानी हे चरित्रनाट्य लिहिले व नाटकापेक्षा हा 'एकपात्री' वेगळा प्रकार करायचे ठरविले. आतापर्यंत या नाटयाचे 2500 प्रयोग झाले आहेत. 'एशियन नाईट्स' द्वारे परदेशातही याचे प्रयोग केले आहेत. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र सरकारचा 'सावित्रीबाई फुले' पुरस्कार मिळाला आहे. तसेच संत स्त्रियांवरील 'बया दारउघड' या नाटकाला 'महाराष्ट्र फौंडेशनचा पुरस्कार' मिळाला आहे. खेडेगावातील स्त्रियांच्या 'बचतगट' या संकल्पनेसाठी 23 वर्षे कार्य केले आहे. त्यासाठी 'मुक्ताईची पाऊलवाट' हे मासिक चालविले आहे.

हा पाठ 'व्हय, मी सावित्रीबाई' या एकपात्री नाट्यातून निवडला असून त्यात सावित्रीबाईंचं लग्न, शिक्षण, शिक्षिका व शेवटचा फुल्यांच्या प्रेतयात्रे बरोबर टिटवं घेऊन जाणाऱ्या सावित्रीबाई या घटना आहेत.

या पाठाचा प्रकार ''एकपात्री प्रयोग'' हा आहे. त्याद्वारा जणू सावित्रीबाई आपल्याशी बोलत आहेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



(मूल्य - समाजकल्याण, निष्ठा)

1) नमस्कार,

आज तुमच्यासंगं बोलावसं वाटतया, आमचं जगनं, आम्ही काय केलं ते उलगडून सांगावसं वाटतया. म्या तर त्येंची बायकू झाली अन् तेंच्या कामात कवा गुरफटून गेलो हे ध्यानातच नाय आलं बघा. आता बगा मी जन्माला आलो ती नायगावात. सातारा जिल्ह्याच्या खंडाळा तालुक्यातलं 'नायगाव', तिथल्या नेवासे पाटलांची थोरली लेक मी. मी चार वर्साची झाली तवा आय म्हणायची ''भाकरी टाकायला शिका आता, मोठी झालीस

नव्हं तू, कारटे! आता लगीन करायला हवं तुझं'' तवर दादांनीबी इचार केलावता का पोरीचं लगीन करायचं म्हून. आन पुन्याच्या फुल्यांच्या मुलाशी माजं लगीन ठरवलं. आता मला काय ठावं हे शेटजी कसं हायेत ते? लगीन झालं पर सासर मला कदी परकं नाय वाटलं. एक तर सासर हे 'तुझं खरं घर' हे कायमचं ऐकल्यालं. त्यात मामंजी लई चांगले व्हतं. सागरगोटे खेळा नायतर काचाकवडयाचा डाव मांडा, लई प्रेमानं हाक मारुन काम सांगायचे. आमचं शेटजी मातुर सदा शाळंत मश्गुल असायचं. त्यांची हीऽऽ मोठामोठाली पुस्तकं, आब्ब्यास वाचायचं-लिवायचं.

हा, मला त्यास्नी शेटजी म्हननं लईच आवडायचं शेटजी म्हंजी कसा रूबाबदार- दिमाखाचा मानूस वाटतो. त्यांचं मैत्तरबी समद्या जाती धरमाच व्हतं.

मी घर आवरीत व्हती समदा पुस्तकांचा पसारा काढलावता. घर नीटनेटकं ठेवायं हवंच की - तेवढयात शेटजी आलं तिथं.

''आग-आग माजी पुस्तक कशाला काढलीस?''

''आत्ता? झाडलोट कराय नगं?''

''माजं पान गेलं बघ पुस्तकाचं.''

''हे घ्या, पान का काय ते''

''कंच पान व्हतं'?

''आता मला काय ठावं कंच पान ते? पर येवडं काय हाय ते?''

''आगं ही चरित्र हायेत हे बग शिवाजी महाराजांचं चरित्र ह्यो त्यांचा फोटू आन हे वॉशिंग्टनच, ह्यो त्याचा फोटू''

''व्हय, तुमास्नी लिवता येतं, तुमीबी लिवाल अशी पुस्तकं?''

''लिवीन की'' ''मला वाचाया शिकवाल?'' ''शिकवीन की!''

...........

चार दोन दीस गेलं न् शेटजी नगरला गेलं. तथं सदाशिव गोवंडे ऱ्हात व्हतं. शिक्शनाचा प्रसार हे येकच खूळ डोक्यात. गोवंडे भावजी त्यास्नी घिऊन कंच्या शाळत गेले. तितं कुनी 'फरार' नावाची मड्डम शाळा शिकवित व्हती. हे दोघं गेलं कसं शिकवावं, काय शिकवावं हे इचारायला.

ते घरी आलं तेच पाटी पुस्तक पेनशील घेऊन, म्यां आपली भाकऱ्या करून चूल आवरत व्हती, चुलीला पोतेरं करायचं म्हनत होती त ते आलं- चेहरा लई- उत्साहात, तेजीत, हात-पाय धूत मला हाक माराय लागलं. म्हनलं. ''आल्यें आल्ये भाकर झालीया, कालवनबी झालया''.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तर म्हनं. ''जेवन नग, तू ये''

म्हनलं - बया बया, आज काय झालय शेटजीनां? हात भराभरा धुऊन भाइर आले त म्होर पाटी पुस्तकांचा पसारा, म्हनलं - ''काय?''

''हे बघ''

''बघितलं, पर काय हये?''

''व्हय आता शिकिवनाराय मी''

''काय''?

''वाचाया-लिवाया''

''कुनाला''?

''तुला''

''काय? तुमी वाचता तसं वाचाया यील्? 'शेटजी' म्हनू?''

''व्हय!'' ते हसायाच लागले.

त्यानी पाटी घेतली आन् लिवलं. ''शे-ट-जी'' आन् म्हनं गिरव आता. मी लाजनं चूर झाले. म्हणलं काय ह्यो नवरा! तं म्हनं - ''गिरीव आता''....

क-ख-ग-घ

त-थ-द-ध वेलांटी, उकार, पाढं, हिसेब, समदं शिकले

फुडं मी पुन्याच्या शाळत शिकवाया गेले शिक्षिका म्हनून !

...............

2) शाळंला शिकवाय गेलं की खिडक्यान म्होर मानसं उभी ऱ्हायची. घान घान शिव्या द्यायची, वरडायची. शाळत गेल्या गेल्या दारं खिडक्या बंद कराया सुरुवात केली. बंद खोल्यात नीतीबोधवाचन बेरीज-वजाबाकी करनं, भूगोलाची माहिती. मराठयांचा इतिहास सांगनं अशी. कामं चालली व्हती, तर बाहेर शेटजी महार-मांगवाडयात जायचं त्यांना शिक्षनाचं महत्त्व सांगायचं!

''एक शूद्र बाई शिक्षिका म्हणून शिकवायला लागली. महाभयंकर!''

''माजले हे शूद्र!''

लोक असं म्हनाया लागलं

लई चर्चा! बाईमानूस शिकवतंय. कुनी छेड काढाय लागलं. कुनी बाजून जायचा-थुंकायचा. कुनी म्होरनं आडवा यायचा-खाकरायचा. अवं लगीन झालेली मी बाय, जीव धाकधुकबी करायचा... एक दीस माग-म्होरं चारदोन जमलं- चारी बाजूनी मला आडिवलं. पोटात खड्डा पडला माझ्या. मी गप उभी ऱ्हाइली, काय करावं? जीव एकवटून वर केल तोंड, आन सुर्याला नमस्कार करुन म्हणलं-'द्येवा, म्यां आपलं कर्तव्य करतीया.... द्येव तुम्हाला क्षमा करो, तुमच भलं करो''. आन् द्येवाच्या, हेंच्या नावाचा मनात जप कराय लागले. मुकाट समदं बाजूला झालं. मातुर शाळंला गेले तरी माजा जीव थाड्-थाड् उडत व्हता. मग मातर दुसऱ्या दिसा पासनं माझ्या संग शेटजींनी एक शिपाई द्येयाला सुरुवात केली.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

आता लहुजीबुवा मांग आणि राणबा महार पोरापोरींना शाळंला आणाया लागलं, तसचं मलाबी सोबत कराया लागलं रस्त्यानंः-

...............

3) त्या दिसी समाजाची बैठक उरकली. समदी मानसं घरी गेली. डॉ. घोले, ससाने शेटजीसंग बोलत होती. बोलता बोलता शेटजींना पक्षाघाताचा झटका आला. शरीराची उजवी बाजू लुळी पडली. डॉ. घोल्यानी लगेच औषधं सुरू केली. थोडं बरं झाल्यावर, तशाही अवस्थेत डाव्या हाताने लिहून अर्ध राहिलेलं 'सार्वजनिक सत्यधर्म' हे बाईमानसांची थोरवी सांगणार पुस्तक लिहून पूर्ण केले.

शेटजींची तब्बेत रूटूखूटूच चालली होती. समद समद-लोकहितवादी, पंडिता रमाबाई भेटाया यून गेली. ''माझा काळ जवळ आला'' सारखं म्हणायचं. आन एक दीस डॉ. घोले आले ते हंबरडा फोडतच! आन महायात्रेची तयारी सुरू झाली. त्यांना न्हायाची येळ आली तवा महादबा भावजी, बाबा भावजी आडवं आलं. ''जोतीबा आमचं भाऊबंद तवा त्यांच्या शवास आमी खांदा देनार''

डॉ. घोले म्हणालं ''तात्यांनीं तसं होऊ न देण्याबद्दल बजावलंय''

''यशवंता आमचा नाय. तवा रीतीनं टिटवं धरु, शकत नाय, अग्नी दिऊ शकत नाय, अग्नी आमीच देनार''. वाद वाढत चालला. तवा एक मी क्षण इचार केला. डोळं पुसलं म्हनलं.

''थांबा, म्या हाय जित्ती. आता नगा शिकवू मला रीत-भात''.

आन ताडताड चालत त्येंच्यापाशी आले, पाया पडले. आन म्होर होऊन टिटवं उचललं, म्हनलं ''चला''. गजानन-यशवंता ते धावत जवळ आलं-बाजूनं चालाया लागलं.

मी चालू लागले. एकेका हुंदक्या बरोबर एकेक आठवणी सांडत व्हत्या. लग्न, त्येंच शिकवणं, आमची शाळा, काशीचा पोरगा यशवंता, पिन्याच्या पाण्याचा हौद, गुलामगिरी पुस्तक, शूद्रांचं बोर्डींग, बालहत्या प्रतिबंध गृह, मृत्युपत्र, सत्यशोधक समाज. अन् ऊर भरून आला जनू म्हणाला, तू बी असंच काम करत मृत्यूला सामोरे जा! मी म्हनाले-''जय सत्य! आदि सत्य! जय सत्य आदि सत्य!''

## शब्दार्थ व टीपा :

▪ गुरफटणे - गुंतून जाणे ▪ अब्ब्यास - अभ्यास ▪ इचार - विचार ▪ अधःपतन होणे - दर्जा घसरणे ▪ धरमसुधारक - धर्मसुधारक ▪ रंजले गांजले - गरीब लोक, पिडीत लोक ▪ साळा - शाळा ▪चंचल - अस्थिर मनाचा ▪ हलकल्लोळ - गोंधळ ▪ तरास - त्रास ▪ शबुद - शब्द, वचन ▪ टकुरं - डोके ▪ जीत्ती - जिवंत ▪ टिटवं - प्रेतापुढे हातात धरलेले अग्नी असलेले मडक्याचे शिंकोळे ▪ पंतोजी - शिक्षक, मास्तर ▪ जीव हरखणे - आनंदित होणे

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

टीपा :

- एक पात्री प्रयोग : मराठी नाटकांच्या इतिहासात एका माणसानेच नाटक करायचे ही संकल्पना, वेगवेगळ्या व्यक्तिंचे बोलणे, अभिनयातून, आवाजातून दाखविणे. या मध्ये पूर्वी सुहासिनी मुळगांवकर जुनी नाटकं सादर करीत. पुढे पु.ल.देशपांडे (असा मी, असा मी), लक्ष्मण देशपांडे, (वऱ्हाड निघालय लंडनला) ह्यांचे प्रयोग होऊ लागले.
- यशवंत : काशी नावाच्या ब्राह्मण विधवा स्त्रीचा मुलगा. त्या ब्राह्मण स्त्रीला सावित्रीबाईनीं आश्रय दिला. पुढे त्याला त्यांनी दत्तक घेतले. यशवंत पुढे डॉक्टर झाला.
- गुलामगिरी : अस्पृश्यता ही माणसांनीच निर्माण केली, हे संवाद रूपाने सांगणारा म.फुल्यांनी लिहिलेला ग्रंथ.
- पिण्याच्या पाण्याचा हौद : उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी सुद्धा मिळणे कठीण. त्यावेळी अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याच्या हौद ज्योतिबांनी खुला केला होता.
- सत्यशोधक समाज : 1873 साली. म. फुल्यांनी ''ईश्वर एकच आहे'' जाती माणसांनी केल्या, लोकांना सत्य काय ते कळावे यासाठी हा समाज स्थापन केला. या सत्यशोधक समाजातर्फे त्यानी भटजीशिवाय लग्नं लावली.
- शूद्रांचे बोर्डींग : सावित्रीबाई आणि ज्योतिबांनी शूद्रातिशूद्रांच्या मुलांसाठी बोर्डींग काढले. 25-30 मुले त्या ठिकाणी राहत असत. 1877च्या दुष्काळात त्या बोर्डींगात 2000 मुले जेवायची.
- बालहत्या प्रतिबंधक गृह : पुरुषांकडून फसवल्या गेलेल्या स्त्रियांसाठी सावित्री ज्योतिबांनी हे गृह सुरु केले. व ''काळे पाणी टाळण्याचा उपाय'' अशा जाहिराती छापून त्यात लिहिलं की फसलेल्या बायकांनी जोतिराव गोविंदराव फुले यांचे घरी येऊन बाळंत होऊन जावे. त्यांचे नाव गुप्त ठेवले जाईल. पंढरपूर, वाई, नाशिक अशा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी या जाहिराती लावल्या होत्या.
- मृत्युपत्र : आजपर्यंत आपण केलेले कार्य आपल्या मागे चालावे म्हणून म. फुल्यांनी 'मृत्युपत्र' केले. आपल्या पश्चात आपला वारस यशवंताच आहे हे लिहिले व आपल्या प्रमाणेच यशवंताने गांजलेल्या शूद्र, अतिशूद्रांना मानवद्रोही ब्राह्मणांच्या कचाटयातून सोडविण्यासाठी आयुष्य खर्च करावे व उभयतांच्या मृत्युनंतर सर्व विधी 'सत्यशोधक' पद्धतीप्रमाणे यशवंताने करावे. असेही लिहिले.
- पंडिता रमाबाई : (1858-ते 1922) रमाबाई अनंत डोंगरे. यांचे वडील स्त्री शिक्षण पुरस्कर्ते होते. लग्नानंतर त्या ब्रिटनला शिकण्यास गेल्या. परत आल्यावर त्यांनी संस्कृतमध्ये प्रावीण्य मिळविले. कलकत्ता युनिव्हर्सिटीने 'संस्कृत पंडिता' ही पदवी त्यांना दिली. संस्कृतमधून मराठी अनुवादासाठी 'सरस्वती' ही पदवी त्यांना मिळाली. आपल्या शिष्यवृत्तीचा उपयोग त्यांनी हिंदू परित्यक्तांसाठी

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

केला. 1881 साली 'आर्य महिला सभा' स्थापना केली. हिंदू विधवा, अंध, अनाथ स्त्रियांसाठी ''शारदा सदन'' ही संस्था स्थापली. 1919 साली ''कैसर-ए-हिंद'' ही पदवी त्यांना मिळाली.

- डॉ. घोले : महात्मा फुल्यांचे सहकारी व फॅमिली डॉक्टर.
- अण्णासाहेब चिपळूणकर, माटे, भिडे, ससाने पंडित-हे फुल्यांचे सहकारी होते.
- लोकहितवादी : गोपाळ हरि देशमुख एक विद्वान व सामाजिक कार्यकर्ते.

## स्वाध्याय :

प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) सावित्रीबाईंचा जन्म कोणत्या गावी झाला?
(2) सावित्रीबाईंचे लग्न कोणाशी झाले?
(3) सावित्रीबाई आपल्या पतीना कोणत्या नावाने संबोधत?
(4) फुल्यांनी वाचून दाखवितो म्हटल्यावर सावित्रीबाईंना काय वाटले?
(5) फुल्यांनी नगरहून काय आणले?
(6) पक्षाघात झाल्यावरही फुले यानी कोणते पुस्तक लिहिले?

प्र.2 खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(1) सावित्रीबाईंच्या वडिलांचे नाव .............. असे होते.
(2) दुसऱ्या दिवसापासून फुल्यांनी सावित्रीबाई बरोबर .............. द्यायला सुरुवात केली.
(3) शेटजी म्हंजी कसा .............. दिमाखाचा मानूस वाटतो .
(4) आज पुन्याच्या .... माजं लगीन ठरवलं.
(5) जोतिबा आमचं .............. तवा त्येंच्या ............... आमी खांदा देणार.
(6) यशवंता आमचा नाय तवा रितीनं तो............. धरू शकत नाय.
(7) जय सत्य .............. .

प्र.3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) फुले शाळेत कशा प्रकारे मश्गुल असायचे?
(2) सावित्रीबाई चार वर्षांच्या झाल्या तेव्हा त्यांची आई काय म्हणाली?
(3) ज्योतिबांनी सावित्रीबाईना कशा तऱ्हेने शिकविले?
(4) शाळेतून येताना सावित्रीबाईंची वाट अडविणाऱ्यांना त्यानी काय उत्तर दिले?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?

(2) आपल्या मृत्युपत्रात ज्योतिबा फुलेंनी काय लिहिले होते ?

(3) फुल्यांनी ''सार्वजनिक सत्यधर्म'' हे पुस्तक कशा अवस्थेत लिहिले ?

प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''माझं पान गेलं बघ पुस्तकाचं.''

(2) ''माझा काळ जवळ आला.''

प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.

(1) सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या, ते सविस्तर लिहा.

(2) पतिच्या मृत्युनंतर टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईंना कोणकोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

## भाषाभ्यास :

(1) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा - काचाकवड्या, सत्यधर्म, मृत्युपत्र, सत्यशोधक.

## उपक्रम :

- डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरील श्री.ज. जोशी यांचे 'आनंदी गोपाळ' हे पुस्तक वाचा.
- 'हिमालयाची सावली' हे वसंत कानेटकर यांनी लिहिलेले नाटक वाचा.

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| श्रेयस्कर | शैथिल्य | वेष्टित |
| रेखीव | मैत्रीण | पारंपरिक |

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ-11 : आई समजून घेताना

उत्तम कांबळे

परिचय :

उत्तम मारुती कांबळे (1956)–'सकाळ' माध्यम समूहाचे माजी मुख्य संपादक. त्यांनी 'श्राद्ध', 'अस्वस्थ', 'नायक', या कादंबऱ्या, 'रंग माणसांचे' 'कथा माणसांच्या' 'कावळे आणि माणसं' 'परत्या, न दिसणारी लढाई' हे कथा संग्रह, तसेच 'देवदासी' आणि 'नग्नपूजा', 'भटक्यांचे लग्न' 'कुंभमेळा, अनिष्ट प्रथा' हे संशोधनपर ग्रंथ तसेच 'जागतिकीकरणात माझी कविता', 'नाशिका तू एक सुंदर कविता' 'पाचव्या बोटावर सत्य' हे कविता संग्रह आणि 'आई समजून घेतांना' व 'वाट तुडवताना' ही आत्मकथने तसेच 'थोडसं वेगळं', 'तिरंग्यातून गेला बाप' ही ललित पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी अनेक ग्रंथाचे संपादन केले आहे 'आई समजून घेतांना' या पुस्तकाचे कन्नड इंग्रजी व ब्रेल लिपीत रूपांतर झाले आहे. यांनी 2010 साली 'ठाणे' येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते.

या पाठाचा प्रकार आत्मकथन असून हा पाठ 'आई समजून घेताना' या पुस्तकातून निवडला आहे.

या पाठात प्रतिकूल परिस्थितीत लेखकाने आपल्या आईस कसे समजून घेतले ते पाहूयात.

(मूल्य - मातृमहिमा)

प्रसंग 1 : सातवीत जेव्हा मी शाळेत पहिला आलो तेव्हा मी उड्या मारतच घरी आलो होतो... पण घरी आक्का, कुठं होती? ती तर रोजगाराला गेली होती. कधी एकदा तिला ही बातमी सांगेन असं झालं होतं. मी उंबरठ्यावर बसून तिची वाट पाहू लागलो. दिवस मावळतीला गेल्यावर ती आली डोक्यावर फांद्यांचा भारा घेऊन भारा डोक्यावर ठेवूनच ती ओरडली, ''पाणी आणलसं का घोटायला?

मी म्हणालो ''अगं भारा तर खाली टाक. तुला आनंदाची बातमी सांगतो'', ती म्हणाली ''कसली बातमी? भारा वाहून डोक्याला कड आलाय. एकजण जळणाचं नाव काढत नाही, एकटी आई किती मरलं याचा कोणी विचार करीत नाही डोक्यात फणी घातली की केसांचा पुंजकाच हाताला येतोय''.



आक्का बडबडत होती. बडबडतच तिनं भारा खाली टाकला. मी तिच्याजवळ जाऊन म्हणालो, ''अगं मी सातवीला पहिला आलोय खूप खूप मार्क मिळाले आहेत''.

आक्कानं एक दीर्घ श्वास घेतला. रंध्रारंध्रात व्यापून राहिलेले वर्षानुवर्षाचे कष्टच जणू तिनं बाहेर टाकले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

‘‘बरं झालं पास झालास बाबा. आता एक कर. चटकन पाणी घेऊन ये आडाचं. तो पर्यंत मी भाजी निवडते. चूल पेटवते’’

आक्कानं माझ्या यशाचं थंड स्वागत केल्यासारखं वाटत होतं. मी काहीच बोललो नाही. पाण्याची घागर, दोर घेतला. चुलीतली राख बाहेर काढता काढता ती म्हणाली ‘‘बरणीतली चिमूटभर साखर तोंडात टाक, आणि हो, चिमूटभरच घे, उद्या तुझ्या बाला चहासाठी ठेव’’.

मी निमूटपणे साखर तोंडात टाकली. घागर आणि दोर घेऊन आडाच्या दिशेने चालू लागलो. आक्का इतकी उदास कशी? लेकराच्या यशाचा तिला आनंद का वाटत नसेल आणि वाटत असेल तर ती व्यक्त का करत नसेल? खांद्यावरची मोकळी घागर प्रश्नांनीच भरल्यासारखी वाटायला लागली. पाणी काढायचा दोर लांब होऊन आणखी ओझं वाढल्यासारखं वाटायला लागलं. का वागत असेल अशी आक्का...विचार करत करतच आडावर पोहोचलो. खोल खोल असलेल्या आडात घागर सोडली; बळ एकवटून ती वर काढली. घराच्या दिशेने चालू लागलो. आपला पोटापाण्याचा प्रश्न व्यवस्थित मिटला असता तर आक्कानं आनंद व्यक्त केला असता का? तिची सारी ताकद तिचं सारं बळ भाकरीच्या लढाईतच खर्च होत नसेल का? आनंद व्यक्त करण्यासाठी तिच्याकडे बळचं नसेल का?

पाणी आणि प्रश्नांचं ओझं घेऊन घरी परतलो. घागर खाली ठेवली दोर खुंटीला अडकवला, आक्का भाकऱ्या थापत होती. विस्तवावर भाजू लागली की सुवास यायचा. पण काय उपयोग? भाकरी तर दीडच मिळणार होती. परातीत भाकरी थापता थापता म्हणाली ‘‘का रे आता पुढच्या शिक्षणाला लई खर्च येईल का?’’

प्रश्न विचारताना तिचा चेहरा गंभीर झाला होता मी काहीच उत्तर दिलं नाही. तसं तीच म्हणाली ‘‘अरे पास झालास पण तुझ्या पुढच्या शिक्षणाचं काय करायचं. पुढच्या खर्चाचं काय करायचं. या चिंतेनं घेरलय मला, तू तर शिकला पाहिजेस. तुझ्यामुळेच आमचं नशीब उजाडणार, पण खर्चाचं काय करायचं? मजुरी वाढत नाही. पाऊस पडत नाही, लोक मुलखावर चाललेत मजुरीला. पण तू काळजी करू नकोस तू शीक. आणखी राबेन मी’’

आक्का गंभीरच होत होती. मी सातवीत पास झाल्याचा आनंद ती का व्यक्त करत नव्हती, हे मला समजायला लागलं. मी आक्काविषयी लगेच गैरसमज करून घेतो. मी तिला समजून घ्यायला हवं. पण कसं हेच कळत नव्हतं. मी म्हणालो, ‘‘तू काळजी नको करूस. मी रायबागला बोर्डिंगात जायचं ठरवलय तिथं जेवण मोफत, राहणं मोफत, आणि शिक्षणही मोफत मिळतं. रायबागला जायलाही पैसे लागणार नाहीत. कारण चालत जाईन मी, डोक्यावर ट्रंक घेऊन, तू काळजी करू नकोस.’’

माझं ऐकून तिला धीर आला. हातातली भाकरी तव्यात टाकत ती म्हणाली ‘‘बाबा थळोबा माझ्या पोराच्या कामात यश दे तुला नारळ देईन.’’ थळोबा नावाच्या माळावरच्या देवावर तिचा विश्वास होता,

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

पण माझा मात्र नव्हता. रात्रंदिवस राबणाऱ्या आणि असंख्य वेळा पाणी पिऊनच भूक मारणाऱ्या माझ्या अक्काच्या मदतीला कोणतेच देव येत नव्हते. उलट देवांनाच नारळ नैवेद्य लागत असे. देवाचा विषय घेऊन मी कधीही तिच्याशी वाद घातला नाही.

मी दिवसा स्वप्न पहात असे. मला चांगली नोकरी लागेल मी आक्काला इतकं भारी लुगडं घेईन, इतकं भारी लुगडं घेईन की सारे बघत राहतील. मी अण्णाला चाकरीतून मुक्त करेन, मी आक्काला माझ्याकडे ठेवेन. तिला कसला कसला त्रास होऊ देणार नाही. खायचं आणि निवांत बसायचं. मी स्वतःसाठी घर बांधेन खूप कष्ट करेन. स्वप्नांची एक जबरदस्त मालिका डोळ्यासमोर उभी रहायची या दिवास्वप्नात आक्का भारी किंमतीच्या नऊवारी लुगडयात दिसायची. तिचा चेहरा हसरा वाटायचा. रोज क्षणाक्षणाला उगवणारं चिंतेचं जंगल तिच्या चेहऱ्यावरून संपलेले दिसायचं.

माझ्या आईचं नाव इलंदा, कोल्हापूर जिल्ह्याची हद्द जिथं संपते त्या खिद्रापूर गावाच्या जवळ 'शिरगुप्पी' हे 'अथणी' तालुक्यातील आमचं गाव, टाकळवाडी हे अक्काचे माहेर. आक्काचं लग्न झालं आणि अण्णा (वडील) रजा संपल्याने परत मिल्ट्रीत गेले. आता ते पुन्हा वर्षानचं परतणार होते म्हणून आक्का सासरी एक दोन महिन्याकरताच जात असे पण आजोबांना हळू हळू अंदाज येऊ लागला होता की इलंदा सासरी सुखी नाही तिचा नवरा दारु पितो, मारतो याचं त्यांना वाईट वाटे या घरात दिली म्हणून ते स्वतःला शिव्या द्यायचे. पुढे पुढे आम्हा मुलांपायी तिचं माहेरी जाणंही बंद झालं.

दारुपाई आक्का अण्णाला रोज शिव्या द्यायची, मार खायची. तिला वाटे की अण्णानं दारू सोडावी, रोज कामाला जावे, पैसे मिळवावेत, संसारासाठी वापरावेत, पोरांना शिक्षणासाठी द्यावेत. घर बांधावं, पोरांना कपडे द्यावेत, पण अण्णाला काहीच वाटत नसे. असा आक्का अण्णाचा संसार! जणू साप आणि मुंगुसाच वैर! दिवसातनं दहा वेळा तरी ती अण्णाला ''तू मरत का नाहीस? कशाला जगतोस भुईला भार होऊन, असं विचारायची.

प्रसंग 2: खरोखरचं एक दिवस माझा अण्णा मरण पावला. परिस्थितीने व्याकुळ झालेली आक्का जमिनीवर डोकं आपटून आक्रोश करत होती. उठता बसता अण्णाला शिव्या देणारी आक्का आज वेगळ्याच रुपात दिसत होती. ओठावर शिव्या असल्या तरी काळजात नवऱ्याविषयी अपरंपार प्रेम आणि श्रद्धा असलेली शोकमग्न आक्का मला नवीन होती. मला वाटलं बरं झालं आक्का सुटली, नवऱ्याच्या संकटातून. पण प्रत्यक्षात तिचं जगचं खलास झालं होतं ''नवरा गेल्यावर काय दुःख होतं ते त्या रांडमुंड बाईलाच माहीत.'' अस उद्विग्न होऊन म्हणायची. आमच्या बरोबर भांडण झालं की लगेच तिला आपल्या नवऱ्याची आठवण येई ''वाघासारखा माझा नवरा गेला म्हणून तुमचं बोलणं खाण्याची वेळ माझ्यावर आली,'' अशा शब्दात ती आपल्या काळजात खोलवर रुतलेला आणि कधीही विस्मरणात न जाणारा आपला नवरा व्यक्त करायची. अशी माझी आक्का, आमच्याकरता उजेडवाटा घडविण्यासाठी आयुष्यभर राबलेली, वर्तमान

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तर तिनं आम्हा लेकरांसाठी गहाण टाकला होता. इतिहास तर तिला समाज व्यवस्थेनं नाकारला होता ती स्वतःचं भविष्य लेकरांच्या भविष्यात बघत होती. आज माझे शब्द सारेसारे तिने केलेल्या लढाईतून जन्माला आले आहेत तिनच मला 'उत्तम', हे नाव दिले आणि लढ, उत्तम होण्यासाठी असचं जणू ती म्हणत असावी!

## शब्दार्थ व टिपा :

▪ घोटायला – प्यायला ▪ कड – वेदना ▪ पुंजका – गळणारे केस ▪ रंध्र – छिद्र ▪ भाकरीची लढाई – अन्न मिळवण्या साठी केलेले कष्ट ▪ मुलुख – परराज्य, दूरचा प्रदेश ▪ थळोबा – ग्रामीण देव ▪ लुंगडं – साडी (नऊवारी) ▪ दिवास्वप्न – मनोराज्य ▪ भुई – जमीन ▪ उद्विग्न – वैताग, चीड ▪ विस्मरण – विसर ▪ गहाण टाकणे – पैशाच्या मोबदल्यात वस्तू ठेवणे. इथे स्वतःच सुख न पाहणे ▪ उजेडवाटा – इतरांना उजेड देण्यासाठी वाट निर्माण करणे ▪ निभावणे – अडचणीतून मार्ग काढणे ▪ साप मुंगुसाचे वैर – न संपणारे भांडण

## टिपा :

▪ अथणी, रायबाग – बेळगाव जिल्ह्यातील गावे.

## स्वाध्याय :

प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) लेखक आईला काय म्हणत असे?
(2) आक्काचे माहेर कोणते?
(3) संध्याकाळी लेखकाने आईला कोणती बातमी सांगितली?
(4) आक्काने डोक्यावरून काय आणले होते?
(5) लेखक पास झाल्याबद्दल आई काय म्हणाली?
(6) लेखकाला रोज किती भाकरी खायला मिळे?
(7) भाकरी थापता थापता आईने लेखकास काय विचारले?
(8) आईने थळोबास कोणता नवस केला?
(9) लेखकाचे वडील कोठे काम करत होते?
(10) आक्का अण्णाला रोज वैतागून काय म्हणत असे?
(11) वडील वारल्यानंतर लेखकाला काय वाटले?
(12) आईला इतिहास कोणी नाकारला होता?
(13) आई आपले भविष्य कोठे पहात होती?
(14) लेखकास आईने कोणते नाव दिले?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्र.2 खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(1) आईची सारी ताकद ............. लढाईतच खर्च होत असे.
(2) लोक ............. चाललेत मजुरीला.
(3) वर्तमान तिनं ............. गहाण टाकला होता.
(4) नवरा गेल्यावर काय ............... होत ते रांडमुंड बाईलाच माहीत.
(5) पण प्रत्यक्षात तिचं ............... खलास झालं होतं.
(6) आक्का अण्णाचा संसार जणू ............... वैर.
(7) माझ्या आईचे नाव ............... .
(8) माझे सारे शब्द तिनं केलेल्या ............... जन्माला आले आहेत.
(9) घे नाव आणि ............... उत्तम होण्यासाठी.

प्र.3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) लेखक बातमी सांगतो म्हटल्यावर आई काय म्हणाली?
(2) आईचा चेहरा गंभीर का झाला?
(3) पाणी आणण्यास जातांना आई लेखकास काय म्हणाली?
(4) अण्णाने काय काय करावे असे आईस वाटे?
(5) आईने लेखकास कोणते आश्वासन दिले?
(6) लेखकाने आईस तू काळजी करू नकोस असे का म्हटले?
(7) माळावरच्या थळोबावर लेखकाचा विश्वास का नव्हता?
(8) आजोबांना वाईट का वाटे?
(9) अण्णा मरण पावल्यावर आईची अवस्था कशी झाली?
(10) लेखकाबरोबर भांडण झाल्यावर आई काय म्हणे?

प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करू शकत नव्हती?
(2) आडावरून घागर घेऊन येताना लेखक कोणत्या प्रश्नांचं ओझं घेऊन आले?
(3) लेखकाबरोबर भांडण झाल्यावर आई काय म्हणे?
(4) लेखक कोणते दिवास्वप्न पहात असे?
(5) अण्णा वारल्यावर आईचे जगच खलास झाले होते म्हणजे काय?
(6) उत्तम कांबळे यांचा थोडक्यात परिचय लिहा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''बाबा थळोबा माझ्या पोराच्या कामात यश दे.''

(2) ''पुढल्या शिक्षणाला लई खर्च येईल का?''

(3) ''तू शिक ! आणखी राबेन मी.''

(4) ''ओठावर शिव्या असल्या तरी काळजात नवऱ्याविषयी प्रेम श्रद्धा असलेली आक्का मला नवीन होती.''

(5) ''ती स्वतःचं भविष्य लेकरांच्या भविष्यात बघत होती.''

(6) ''वर्तमान तर आम्हा लेकरांसाठी तिनं गहाण टाकला होता.''

प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.

(1) आक्काला अण्णांनी काय करावे असे वाटत असे? का?

(2) पाठातील दोन प्रसंगातून लेखकाने आईला कसे समजून घेतले?

भाषाभ्यास

(1) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास ओळखा-वर्षानुवर्षे, गैरसमज, रात्रंदिवस, असंख्य, दिवास्वप्न, क्षणाक्षणाला, शोकमग्न, विस्मरण, उजेडवाटा, समाजव्यवस्था, रंध्ररंध्रं.

(2) खालील वाक्यातील अलंकार ओळखून लक्षणे सांगा.

  (1) रंध्रारंध्रात व्यापून राहिलेले कष्टच जणू तिनं बाहेर टाकले.

  (2) खांद्यावरची रिकामी घागर प्रश्नांनी भरल्यासारखी वाटली.

  (3) आक्का आणि अण्णाचा संसार जणू साप मुंगसाचं वैर!

  (4) वाघासारखा माझा नवरा गेला.

  (5) काळजात खोलवर रुतलेला बाण आणि कधीही विस्मरणात न जाणारा नवरा व्यक्त करायची.

उपक्रमः

- जी.ए. कुलकर्णी यांची 'फेड' ही कथा वाचा.
- डॉ. श्रीराम लागू यांचे 'लमाण' हे आत्मचरित्र वाचा.

शुद्धलेखनः

पुढील शब्द असेच लिहा.

| |
|---|
| उज्ज्वल, बहिर्मुख, दृश्य, महोत्सव |
| दुःस्वप्न, उत्कट, पारितोषिक |

***

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ-12 : स्वरगंगा

प्रा. संध्या देशपांडे

K2E8T4

परिचय :

प्रा. संध्या व्यंकटेश देशपांडे (1958) आर.पी.डी. कॉलेज बेळगावी येथे मराठी विभाग प्रमुख म्हणून निवृत्त. नाट्यक्षेत्रात दिग्दर्शन, भूमिका आणि लेखनकार्य. 'नाट्यांकुर' या संस्थेची स्थापना. 'अजन्मा', 'आक्रित', 'अकल्पित', 'वॉज आय रॉंग', या एकांकिका 'अश्वदा', 'सुलतान', बी पाझिटिव्ह या त्यांचा कादंबऱ्या, जीना इसीका नाम, अंतस्थ, कहाणी गोवा मुक्तीची, मेघबंधन ही नाटके 'मानवतावादी बसवण्णा' (अनुवादित) 'स्वरगंगा' (चरित्र) असे त्यांचे लेखनकार्य आहे. 'अंतस्थ', या नाटकास रत्नागिरीच्या श्रीरंग संस्थेचा लेखन पुरस्कार कृ.ब. निकुंब पुरस्कार, गो.म. कुलकर्णी पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

गंगूबाई हनगल हिंदुस्थानी संगीतातील एक अग्रगण्य नाव. किराणा घराण्याची गायकी त्यांनी परदेशातही लोकप्रिय केली. त्यांच्या बद्दल अधिक जाणून घेऊया या पाठातून.

हा पाठ 'स्वरगंगा' या पुस्तकातून संपादित करुन घेतला असून याचा वाङ्मय प्रकार 'व्यक्तिचित्र' हा आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य - चिकाटी, ध्येयनिष्ठा)

गंगूबाईंचा जन्म 5 मार्च 1913 या दिवशी धारवाड येथील शुक्रवार पेठेतल्या राहत्या घरी झाला. तो शिवरात्रीच्या आदल्या दिवशी झाला म्हणून त्यांच नाव 'गंगू' ठेवलं. त्यांच्या आईचे नाव होते अंबाबाई. स्वरांचा पहिला संस्कार गंगूबाईंवर घडविला तो अंबाबाईंनीच. त्या स्वतः उत्तम कर्नाटकी संगीत गात. अनेक लग्नसमारंभातून त्यांच्या गाण्याचे जलसे होत. किराणा घराण्याचे संस्थापक अब्दुल करीम खाँ यांनीही अंबाबाईंचे गाणे ऐकले होते व त्यांना दादही दिली होती. एकदा ते आले असताना गंगूबाईही अंबाबाईंच्या जवळ बसल्या होत्या. ''तूही गातेस वाटतं?'' त्यांनी गंगूबाईंना विचारले. गंगूबाईंनी मान हलवली. ''मग, गा बघू काही तरी'' खाँ साहेब म्हणाले. गंगूबाईंनी लगेच त्यांना एक पद म्हणून दाखविले. एवढयाश्या नाजूक मुलीचा तो आवाज आणि ढंग पाहून खाँ साहेब उद्‌गारले. ''बहुत अच्छा बेटी! अब खूब खाना



और बहुत गाना''. लहानपणी गंगूबाईंना ताल समजत नसे. त्यासाठी अंबाबाई त्यांना रागवत ''तुला टाळ भिजत घालून त्याचं पाणी पाजलं पाहिजे. म्हणजे ताल समजेल''. असं त्या गंगूबाईंना नेहमी म्हणत. गंगूबाईंचा हिंदुस्थानी संगीताकडे असलेला कल पाहून अंबाबाईंनीही त्यांना हिंदुस्थानी संगीताचेच शिक्षण देण्याचे ठरविले. एवढेच नव्हे तर आपल्या कर्नाटकी संगीताचा संस्कार गंगूबाईंवर होऊ नये म्हणून आपले गाणेही त्यांनी थांबविले.

अशा एका सुरेल उदरातून दुसरा एक सुरेल सूर निर्माण होत होता. फुलत होता.

वयाच्या सातव्या वर्षी धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात गंगूबाईंना दाखल करण्यात आले. गंगूबाईंनी देशप्रेमाचे धडे येथेच गिरविले. बेंद्रे मास्तर मुलांच्या शाळेचे मुख्याध्यापक होते. ते स्वतः उत्तम कवी आणि संगीताचे जाणकार होते. लहानपणी बेंद्रे मास्तरांची शाबासकी आणि प्रेमाची थाप पाठीवर पडली म्हणजे गंगूबाईंना प्रोत्साहित झाल्यासारखे वाटे.

राष्ट्रीय विद्यालयात अनेक मोठे मोठे साहित्यिक आणि राजकारणी येत. येथेच गंगूबाईंनी टिळकांना पाहिले. राष्ट्रीय शाळेत 'वंदेमातरम्' आणि भारतमातेचे वर्णन असणारी प्रार्थना असे. सरकारी शाळेत किंग जॉर्ज पंचम आणि क्वीन मेरी यांचा गौरव असणारी गाणी म्हटली जात. सरकारी शाळेतील प्रार्थना गंगूबाईंना आवडत नसे, पण आपल्या शाळेतील प्रार्थना मात्र त्या मनापासून गात. ती प्रार्थना म्हणजे 'वंदेमातरम' हे गीत होय.

गंगूबाईंच्या बालपणातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे बेळगावी काँग्रेस. बेळगावीला काँग्रेसचे अधिवेशन भरणार आणि महात्मा गांधी त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होणार या बातमीने साऱ्या परिसरातच चैतन्य पसरले होते. 1924च्या बेळगावी काँग्रेस अधिवेशनाचे स्वागत गीत गंगूबाई आणि त्यांच्या शाळेतील इतर विद्यार्थिनींनी मिळून गाण्याचे ठरले. गांधीजींना पहायला मिळणार, राष्ट्रीय काँग्रेसचे नेते पहायला मिळणार याचा गंगूबाईंना आनंद झाला. त्यावेळी त्यांचे वय अवघे 11 वर्षाचे होते. पण स्वातंत्र्याचे बाळकडू त्यांना वंशपरंपरेनेच लाभले होते. त्यांच्या घराण्यातच देशभक्ती होती. म्हणूनच काँग्रेसच्या अधिवेशनात आपल्याला स्वागतगीत गाता येणार या कल्पनेने गंगूबाई भारावून गेल्या.

स्वागतगीत शिकविण्यासाठी मैसूरु येथून एक मास्तर आणण्यात आले होते. स्वागतगीत बसले आणि सारी मंडळी बेळगावी काँग्रेससाठी बेळगावीला आली. कार्यक्रम सुरू झाला तेव्हा व्यासपीठावर गांधीजी, नेहरू, महम्मदअली जीना, गंगाधर देशपांडे अशी बडी बडी मंडळी बसलेली होती. गंगूबाईंचे हृदय धडधडू लागले, पण स्वागतगीत इतके उत्तम झाले की प्रत्यक्ष गांधीजींनी त्यांना शाबासकी दिली. त्यांना त्यांच्या गाण्याचे भय वाटत नव्हते. आपल्या जातीवरून आपला अपमान होईल असे भय त्यांच्या मनात होते. कारण त्यांची जात होती गंगामत. गंगामत म्हणजे कोळी किंवा नावाडी. धारवाडमध्ये असताना त्यांनी याचा अनुभव घेतला होता. पण इथे मात्र त्यांना कोणीच छेडले नाही की त्यांचा पाणउताराही केला नाही. गंगूबाई जेवणाच्या पंक्तीत घाबरुन खाली मान घालून बसल्या होत्या. लोक आपली जात विचारतील आपल्याला पंक्तीतून उठवतील असे भय त्यांना वाटत होते पण तसेही घडले नाही. उलट ही घटना दीर्घकाळ त्यांच्या स्मरणात आनंद देत राहिली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

नंतर हुब्बळीला कृष्णाचार्य हुलगूर यांच्याकडे त्यांचे संगीत शिक्षण सुरू झाले. गंगूबाईंचा आवाज अतिशय पातळ नाजूक आणि बारीक होता की त्या गाऊ लागल्या की त्यांचा घसा दुखू लागे, पण त्यांनी गाणे थांबवले नाही. डॉक्टरांनी टॉन्सिल्सचे ऑपरेशन करण्यास सांगितले. आता गळ्यावर शस्त्रक्रिया करायची. हे ऐकून सारेच घाबरले.

शेवटी ऑपरेशन झाल्यावर काही दिवस त्यांनी विश्रांती घेतली आणि पुन्हा गाऊ लागल्या पण त्यांचा आवाज संपूर्ण बदलून गेला होता तो पुरुषी झाला होता पण त्यामुळे गंगूबाई खचल्या नाहीत ही दैवी देणगी आहे. असे मानून जिद्दीने रियाज करत राहिल्या पुढे काही कारणास्तव कृष्णाचार्य हुलगूर यांची शिकवणी बंद झाली. तेव्हा कुंदगोळ येथे सवाई गंधर्वांच्याकडे गंगूबाई संगीताचे शिक्षण घेऊ लागल्या. अशा प्रकारे 'किराणा' घराण्याच्या चौकटीत त्यांनी पदार्पण केले. कुंदगोळात तेव्हा वीज नव्हती. गाव लहान आजूबाजूला शेतीवाडी खूप. सातलाच अंधार पडे. रात्र फार झाली की सवाई गंधर्व भीमसेनना सांगत. ''कंदील घेऊन जा आणि यांना गाडीत बसवून या''. भारतरत्न भीमसेन जोशी आणि डॉ. गंगूबाई हनगल यांनी पुढे आयुष्यभर हे बहिणभावाचे नाते अत्यंत प्रेमाने आणि आदराने निभावले.

खर्ज-रियाजाची सवय गुरुजींनी गंगूबाईंना लावली. पहाटे उठून खर्जाचा रियाज दोन दोन तास केलाच पाहिजे असा त्यांचा दंडक होता. कालांतराने सवाई गंधर्वांनी नाटकात काम करणे बंद केले. त्यांचा एक मुलगा आजारी व मतिमंद होता. त्याच्या औषधोपचारासाठी ते हुब्बळ्ळीलाच येऊन राहू लागले. गंगूबाईंनी आपल्या घरातल्याच दोन खोल्या त्यांना राहण्यासाठी दिल्या. जवळजवळ पंधरा वर्षे गंगूबाई सवाई गंधर्वांकडे शिकल्या. गुरुजींनी कधी गुरुदक्षिणा मागितली नाही. आपण त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे म्हणून त्यांनी गुरुजींना आपली मुलगी कृष्णा हिला शिकवण्याची विनंती केली.त्याची 50 रू. फी सुद्धा त्या देऊ लागल्या. ''राहण्यासाठी फुकट घर दिलेस. आता ही फी मी घेणार नाही''. असे गुरुजी म्हणू लागले, पण गंगूबाईंनी त्यांचे ऐकले नाही.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

एकदा फकीरप्पा कुंदगोळ यांच्या शाळेच्या वार्षिक समारंभात गंगूबाईंना गायचे होते. समोर सवाई गंधर्व बसलेले पाहून गंगूबाईंची अगदी घाबरगुंडी उडाली. त्या तानपुरा ठेवून पळून आल्या. पुढे कित्येक दिवस सवाई गंधर्व ती आठवण काढून गंगूबाईंची चेष्टा करत, पण हळूहळू गंगूबाईंचे गाणे देशभरच नव्हे तर जगभर पसरले. हा आपल्या गुरुजींचा आणि शारदांबेचाच आशीर्वाद आहे अशी गंगूबाईंची भावना होती.

हुब्बळ्ळीत अनेक धर्माचे स्वामी आणि आचार्य मंडळी येत असत. गंगूबाईंना प्रश्न पडे. ''आपले स्वामी कोण?'' एकदा त्यांनी आपल्या आईला हा प्रश्न विचारला. ''आपण शारदेचे उपासक आहोत म्हणून शृंगेरीचे शंकराचार्य हेच आपलेही गुरुजी आहेत''. असे अंबाबाईंनी त्यांना सांगितले.

डॉ. वागळे नावाचे हनगल कुटुंबियांचे एक स्नेही हुब्बळ्ळीत होते. त्यांच्याकडे एकदा शृंगेरी मठाचे शंकराचार्य आले असता डॉक्टरांनी त्यांच्यासाठी गंगूबाईंचे गाणे ठेवले होते. ते ऐकून शंकराचार्य इतके

प्रभावित झाले की गंगूबाईंना शृंगेरीस येऊन गाण्याचा कार्यक्रम करण्यास सांगितले, गंगूबाईंना आनंद झाला; पण योग जुळून येत नव्हता. अचानक शृंगेरीतील एका संस्थेनेच गंगूबाईंचे गाणे ठेवले. त्या शृंगेरीस गेल्या. मठा शेजारीच कार्यक्रम होता. शंकराचार्य गाणे ऐकायला येऊन बसले. कार्यक्रम अत्यंत रंगला. तासाभराने शंकराचार्य उठले. त्यांच्या पूजेची वेळ झाली होती, पण त्यांनी गंगूबाईंना निरोप दिला. ''मी उठतो. माझ्या पूजेची वेळ झाली आहे पण गाणे थांबवू नकोस. दीड तास गा''. गाणे संपवून दोन तासांनी गंगूबाई उठल्या. लोकांनी गाण्याची खूप तारीफ केली. गंगूबाईंना मठातून बोलावणे आले. त्या गेल्या तेव्हा शंकराचार्य म्हणाले ''फार सुंदर सेवा केलीत शारदांबेची. संगीत आणि अध्यात्म यांचे नाते अपूर्व आहे. अजोड आहे. स्वर हे ईश्वराशी संवाद साधण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे''.

शंकराचार्यांनी आपल्या अनुयायांना बोलावले आणि सांगितले ''जा शारदांबेच्या अंगावरचे एक वस्त्र हिला द्या आणि प्रसाद म्हणून दुसरीही एक साडी चोळी द्या''.

त्या दिवशी शारदांबेचा आशीर्वाद खऱ्या अर्थाने आपल्याला मिळाला असे गंगूबाईंना वाटले. एक मौलिक ठेवा म्हणून गंगूबाईंने ते वस्त्र जपून ठेवले. कधी कधी त्या ते नेसत किंवा नुसतेच काढून कपाळी लावत.

गंगूबाईंनी भावगीते, भक्तिगीते गायिली नाहीत. मी ''जे गाते ते भक्तिभावाने गाते. असे त्या म्हणत. स्त्रियांच्या गाण्याला त्यांनी प्रतिष्ठा'' मिळवून दिली. मामा वरेरकरांच्या 'विजयाचे लग्न' या चित्रपटात त्यांनी भूमिका केली; पण ते विश्व त्यांना आवडले नाही. संगीत हाच त्यांचा श्वास होता आणि तोच त्यांचा ध्यास होता. नेपाळ, पाकिस्तान, अमेरिका, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी अशा विविध देशात त्यांनी किराणा घराण्याची श्रीमंती पोचविली. लोकांनीही त्यांना डोक्यावर घेतले. पद्मविभूषण, पद्मभूषण, तानसेन पुरस्कार, केंद्रीय संगीत नाटक अकादमी पुरस्कार, माणिकरत्न, कर्नाटकभूषण, गोदावरी पुरस्कार असे असंख्य पुरस्कार त्यांना मिळाले. सहा विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट देऊन गौरविले. संगीत सरस्वती, संगीत सम्राज्ञी, भारतीय कंठ अशा उपाधींनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

21 जुलै 2009 रोजी सकाळी 7 वाजून 10 मिनिटांनी ही स्वरगंगा पंचत्वात विलीन झाली. मृत्युनंतर त्यांनी नेत्रदान केले. मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प त्यांनी पूर्वीच केला होता. मातृऋण, गुरुऋण आणि समाजऋण साऱ्यातून त्या मुक्त झाल्या. युगायुगातून असा एखादाच जीव जन्माला येतो. आभाळाएवढा !

## शब्दार्थ व टीपा :

▪ जलसे – गाण्या, बजावण्याची मैफल ▪ उदर – पोट ▪ अधिवेशन – सभा, बैठक ▪ रियाज – तालीम, अभ्यास, सराव ▪ दंडक – नियम, परिपाठ ▪ तानपुरा – तंबोरा ▪ मौलिक – किंमती ▪ उपाधि – पदवी ▪ संकल्प – मनोदय, हेतू, इच्छा ▪ दीर्घकाल – पुष्कळ वर्षे

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

टीपा :

- किराणा घराणे – आग्रा, ग्वाल्हेर, जयपूर इत्यादि हिंदुस्थानी संगीत परंपरेपैकी एक घराणे. अब्दुल करीम खाँ साहेब हे या घराण्याचे संस्थापक.
- बेंद्रे मास्तर – द.रा. बेंद्रे मराठी व कन्नड भाषेत लिहिणारे साहित्यिक. ज्ञानपीठ पारितोषक विजेते.
- किंग पंचम जॉर्ज, क्वीन मेरी – इंग्लंडचा राजा व राणी

## स्वाध्याय :

प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) किराणा घराण्याचे संस्थापक कोण?
(2) हुब्बळ्ळीला असताना गंगूबाईंनी संगीताचे धडे कोणाकडून घेतले?
(3) बेळगावीच्या काँग्रेस अधिवेशनात गाताना गंगूबाईंना कोणते भय वाटत होते?
(4) गंगूबाईंनी कोणत्या प्रकारची गाणी गायिली नाहीत?
(5) सरकारी शाळेतील प्रार्थना गंगूबाईंना का आवडत नसे?
(6) बेळगावीच्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते?
(7) गंगूबाईंनी कोणत्या चित्रपटात भूमिका केली?
(8) गंगूबाईंचे निधन केव्हा झाले?
(9) गंगूबाईंना शारदांबेच्या अंगावरचे वस्त्र कुणी दिले?
(10) बेळगावीच्या काँग्रेस अधिवेशनात व्यासपीठावर कोण कोण बडी मंडळी बसली होती?

प्र.2 खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा .

(1) गंगूबाईचा जन्म .............. येथे झाला.
(2) गंगूबाईंच्या आईचे नाव .............. असे होते.
(3) धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात .............. हे मुख्याध्यापक होते.
(4) गंगूबाईंचा जन्म ............... या दिवशी झाला.
(5) गंगूबाईंच्या बालपणातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे .............. .

प्र.3 पहिल्या जोडीतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.

(1) स्वरगंगा : संध्या देशपांडे : : आई समजून घेताना : ...............
(2) स्वरगंगा : व्यक्तिचित्र : : क्रांतिज्योती सावित्रीबाई : ...............

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) गंगूबाईंना कोणकोणते पुरस्कार आणि उपाधींनी सन्मानित करण्यात आले?

(2) गंगूबाईंच्या गळ्यावर शस्त्रक्रिया का झाली? त्याचा काय परिणाम झाला?

(3) गंगूबाईंनी आपल्या गुरुंना कोणती गुरुदक्षिणा दिली?

(4) अब्दुल करीम खाँ आणि गंगूबाईंची भेट कशी झाली? त्यांनी कोणते उद्‌गार काढले?

प्र.5 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात वातावरण कसे होते?

(2) बेळगावी कॉंग्रेसमधील घटनांचे वर्णन करा?

(3) शारदांबेचा आशीर्वाद खऱ्या अर्थाने आपल्याला मिळाला, असे गंगूबाईंना का वाटले?

प्र.6 संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''अशा एका सुरेल उदरातून दुसरा एक सुरेल सूर निर्माण होत होता फुलत होता''.

(2) ''स्वर हे ईश्वराशी संवाद साधण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे''.

(3) ''बहुत अच्छा बेटी. अब खूब खाना और बहोत गाना''.

(4) ''कंदील घेऊन जा आणि यांना गाडीत बसवून या''.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

प्र.7 खालील प्रश्नाचे उत्तर सात ते आठ वाक्यात लिहा.

(1) गंगूबाईंनी संगीत शिक्षणासाठी कशा प्रकारे कष्ट घेतले? त्यांची गुरुनिष्ठा कोणत्या प्रसंगातून दिसून येते?

भाषाभ्यास :

(1) विरुद्धार्थी शब्द लिहा

(1) श्रीमंत, आनंद, बंद, दीर्घ, प्रतिष्ठा, अंधार, प्रेम, सुरेल

(2) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास ओळखा.

(1) नेत्रदान, औषधोपचार, भारतमाता, स्वागतगीत, देशभक्ती, बहीणभाऊ, मातृऋण, मतिमंद, गुरुदक्षिणा, उपासक, अपूर्व, अजोड, भक्तिभाव.

(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

दाद देणे, पाणउतारा करणे, पदार्पण करणे, योग जुळून येणे, पंचत्वात विलीन होणे, डोक्यावर घेणे, बाळकडू मिळणे, तारीफ करणे.

(4) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांची विभक्ती ओळखा.

1) एक सुरेल उदरातून दुसरा एक सुरेल सूर निर्माण होत होता.
2) गंगूबाईंनी देशप्रेमाचे धडे गिरविले.
3) स्वरगंगा पंचत्वात विलीन झाली.

उपक्रम :

- पंडित भीमसेन जोशी यांच्याविषयी माहिती मिळवा व त्यांनी गायलेले अभंग मिळवून ऐका.
- 'माझा आवडता गायक' या विषयावर 15 ते 20 ओळी निबंध लिहा.

शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| गुळमुळीत | सुळसुळीत | चुरचुरीत |
| चुणचुणीत | चरचरीत | विमनस्क |

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# कविता-7: पृथ्वीचे प्रेमगीत

कुसुमाग्रज

परिचय :

विष्णू वामन शिरवाडकर (1912-1999) नाशिक येथे वास्तव्य होते. अग्निसंप्रदायी, मानवतावादी कवी म्हणून ओळखले जातात. 'जीवनलहरी', 'विशाखा', 'किनारा', 'मराठी माती' हे काव्यसंगह ; तसेच 'वैष्णवी', 'कल्पनेच्या तीरावर', 'जान्हवी' या कादंबऱ्या, 'फूलवाली' (लघुकथासंग्रह), 'आहे आणि नाही' (लघुनिबंध संग्रह), 'समिधा' हा गद्यकाव्य संग्रह, 'दूरचे दिवे', 'दुसरा पेशवा', 'कौंतेय', 'राजमुकुट', 'नटसम्राट' 'वीज म्हणाली धरतीला' ही त्यांची नाटके प्रसिद्ध आहेत. भावनाशीलता, ओजस्वी भाषाशैली आणि उत्तुंग कल्पनाविलास ही कुसुमाग्रजांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. ते 'ज्ञानपीठ' पुरस्काराचे (1987) मानकरी आहेत.

पृथ्वी स्वतःच्या आसाभोवती फिरत फिरत सूर्याभोवती फिरते हे भौगोलिक सत्य आहे, पण या कवितेत कुसुमाग्रजांच्या कल्पनाविलासाला बहर येतो व पृथ्वीचं सूर्याकडे प्रेमाची याचना करते अशी भव्य व उदात्त प्रेमाची कल्पना ते मांडतात. तसेच चंद्र, धूमकेतू, मंगळ, ध्रुव हे तारे ही पृथ्वीवर प्रेम करत आहेत पण तेजस्वी सूर्यापुढे हे क्षुद्र आहेत म्हणून पृथ्वी सूर्याचे दूरपणही स्वीकारते असा हा तेजस्वी कल्पनाविलास कवितेत दिसतो.

ही कविता त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे. ही कविता 'सुमंदारमाला' वृत्तामध्ये आहे. ही प्रेमकविता आहे.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य - चिरंतन प्रेम)

युगामागुनी चालली रे युगे ही
करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेंत धावू तुझ्या मी
कितीदा करु प्रीतिची याचना ?

नव्हाळीतले ना उमाळे, उसासे
न ती आग अंगात आता उरे
विझूनी आता यौवनाच्या मशाली
उरी राहिले काजळी कोपरे !

परी अंतरी प्रीतिची ज्योत जागे
अविश्रांत राहील अन् जागती
न जाणे न नेणें कुठे चालले मी
कळे तू पुढे आणि मी मागुती !

दिमाखात तारे नटोनी थटोनी
शिरी टाकिती दिव्य उल्का-फुले
परंतू तुझ्या मूर्तिवाचून देवा,
मला वाटते विश्व अंधारले !

तुवा सांडलेले कुठे अंतराळी
वेचूनिया दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशू
तपाचार स्वीकारुनी दारुण

पिसारा प्रभेचा उभारून दारी
पहाटे उभा शुभ शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतीची लाजुनि लाल
होउनिया लाजरा मंगळ !

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

निराशेत संन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळी उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधी आर्जव

परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे !
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे !

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
धुळीचेच आहे मला भूषण !

## शब्दार्थ व टीपा :

▪ युग - मोठा कालविभाग (कृत, त्रेता, द्वापार, सत्, कली असे विश्वाचे कालमापक विभाग) ▪ वंचना - प्रतारणा, फसवणूक ▪ कक्षा - मर्यादा, ग्रह ताऱ्यांचा मार्ग ▪ याचना - विनंती ▪ नव्हाळी - तारुण्यातला बहर ▪ उमाळे - जोर, आवेग, प्रभाव ▪ उसासा - सुस्कारा ▪ आग - रग, उत्साह ▪ विझणे - मालवणे, थंड होणे ▪ यौवन - तारुण्य ▪ मशाल - तारुण्याचे तेज ▪ काजळी कोपरे - निराशारूपी काळोख ▪ शिरी - डोक्यावर ▪ उल्का फुले - चांदण्यारूपी फुले ▪ तुवा - तू ▪ सांडलेले - पडलेले ▪ तेजःकण - तेजाचे कण ▪ सुधांशू - चंद्र ▪ तपाचार - तपश्चर्या ▪ दारुण - घोर, कठोर ▪ प्रभा - तेज ▪ संन्यस्त - संन्याशाप्रमाणे ▪ पिसाटा परी - वेडयाप्रमाणे (प्रेमाचा वेडा) ▪ काजवा - रात्री प्रकाशणारा एक किडा ▪ क्षुद्र - क्षुल्लक, हलके ▪ साहवे - सहन होणे ▪ ज्ञात - माहीत ▪ अलंकारणे - शृंगारणे ▪ भूषण - शोभून दिसणे, अलंकार ▪ मित्र-सूर्य

## स्वाध्याय

प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

(1) युगामागुनी चालली रे युगे ही असे कोण म्हणत आहे ?
(2) पृथ्वीच्या अंतरी कोणती ज्योत जागी आहे ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(3) दिमाखात नटूनथटून कोण जात आहेत ?

(4) पहाटेच्या वेळी कोण उभा आहे ?

(5) धूमकेतू कशाप्रकारे आर्जवे करतो ?

प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(1) ............ चालली रे युगे ही.

(2) विझुनी आता ............ मशाली.

(3) शिरी ............ उल्का फुले.

(4) पहाटे उभा ............ हा प्रेमळ.

(5) करी ............ कधी आर्जव.

(6) घेऊ गळ्याशी कसे ............

(7) ऋषींच्या कुळी ............ ध्रुव.

(8) तुवा सांडलेले कुठे ............

(9) मला मोहवाया बघे हा ............

प्र.3 खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.

(1) विश्व केव्हा अंधारले असे पृथ्वीला वाटते ?

(2) पृथ्वीने सूर्याकडे कोणती याचना केली आहे ?

(3) सुधांशू तपाचार कुणासाठी व का करीत आहे ?

(4) पृथ्वीला कशाचे भूषण वाटते ? का ?

प्र.4 खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

(1) पृथ्वी सूर्याची याचना कशी करत आहे ? तिची सध्याची अवस्था कशी आहे ?

(2) धुळीचेच आहे मला भूषण असे पृथ्वी का म्हणत आहे ?

(3) कुसुमाग्रज यांचा थोडक्यात परिचय लिहा.

प्र.5 खालील ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा

(1) ''परंतु तुझ्या मूर्तिवाचून देवा
मला वाटते विश्व अंधारले''

(2) ''पिसारा प्रभेचा उभारुन दारी
पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ''

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्र.6 खालील प्रश्नांची सात ते आठ वाक्यात उत्तरे लिहा.

(1) पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण कोण व कशाप्रकारे याचना करीत आहेत ?

(2) पृथ्वी-सूर्य, चंद्र-पृथ्वी यांचा संवाद तुमच्या शब्दात लिहा.

(3) या कवितेचा सारांश थोडक्यात लिहा.

## भाषाभ्यास

(1) समानार्थी शब्द लिहा.
भास्कर, वंचना, मशाल, दिमाख, आर्जव

(2) संधी विग्रह करुन प्रकार लिहा.
तेजःकण, तपाचार, दुर्बळ, सुधांशू

(3) अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

(1) ''पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधी आर्जव !''

(2) ''पिसारा प्रभेचा उभारुन दारी
पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ''

(4) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास ओळखा
उमाळे-उसासे, अविश्रांत, उल्काफुले, तेजःकण, तपाचार, सुधांशू

(5) खालील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा
''युगामागुनी चालली रे युगे ही करावी किती भास्करा वंचना''

## उपक्रम

- 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या' ही भा.रा.तांबे यांची कविता मिळवून वाचा.
- सूर्यमाले विषयी तुमच्या विज्ञान शिक्षकांकडून अधिक माहिती मिळवा

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| करमणूक | फसवणूक | पिळवणूक |
| पौष्टिक | मिरवणूक | मनोविकार |

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# कविता-8: सत्कार

मंगेश पाडगावकर

N6S4Y1

परिचय :

मंगेश केशव पाडगावकर (1929 - 2015) हे नवकवींच्या दुसऱ्या पिढीतील मान्यवर कवी आणि लघुनिबंधकार त्यांनी 'जिप्सी', 'उत्सव', 'विदूषक', 'सलाम', 'भटकेपक्षी' इ. कवितासंग्रह लिहिले आहेत. त्यांच्या कवितांमधून निसर्गसौंदर्य, प्रेमभावनेची सूक्ष्म रूपे, उपरोध, समाजभाष्ये, चित्रदर्शी प्रतिमा, संवेदनशीलता उत्कटपणे व्यक्त होतात. त्यांच्या 'सलाम' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. 2010 साली दुबईत झालेल्या विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. तसेच 2013 साली भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' पुरस्कार दिला आहे.

ही कविता 'जिप्सी' या काव्यसंग्रहातून निवडली असून कवितेचा प्रकार (मुक्तछंद) निसर्गकविता आहे.

(मूल्य - लढा, संघर्ष)



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार
उरि जेव्हा ज्वालारस झेलून
धरतीने तप केले दारुण
सुकता सुकतां नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

त्या काळी धरणीच्या पोटी
या इवल्या बीजाच्या ओठी
थरथरली स्फुरली होती हो श्रध्देची ललकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

कवच भूमिचे आणि अचानक
भेदुनि आले हिरवे कौतुक
नचिकेताचे स्वप्नच अथवा अवचित हो साकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

मातीची ही मात मृत्युवर
मृत्युंजय श्रध्देचा अंकुर
हा सृजनाचा विजयध्वज, हा जीवनसाक्षात्कार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

म्हटले स्वागतगीत खगांनी
केला मुजरा लवून ढगांनी
लाल मातिचा गुलाल उधळित पवन करी संचार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

कोसळली सर दक्षिण उत्तर
घमघमले मातीतुनि अत्तर
अष्ट दिशांतुन अभीष्टचिंतन, घुमला जयजयकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## शब्दार्थ व टीपा :

▪ तृणपाते - गवताचे पान ▪ सत्कार - गौरव ▪ ज्वालारस - लाव्हारस, ज्वालामुखीतून बाहेर पडणारा तप्तरस ▪ उरि - छातीवर ▪ झेलून - सोसून ▪ तप - तपश्चर्या ▪ दारुण - कठीण ▪ विश्वसंहार - जगाचा नाश ▪ इवल्या - छोटया ▪ श्रध्देची ललकार - भक्तिची आरोळी ▪ कवच - जमिनीचा वरचा भाग ▪ भेदून - छेदून ▪ हिरवे कौतुक - हिरवा कोंब ▪ अवचित - अचानक ▪ मात - विजय ▪ मृत्युंजय - मरणावर विजय मिळवलेला ▪ अंकुर - कोंब ▪ सृजन - नवनिर्मिती ▪ विजयध्वज - विजयाचा झेंडा ▪ साक्षात्कार - ईश्वरी कृपा ▪ स्वागतगीत - स्वागताचे गाणे ▪ खग - पक्षी ▪ मुजरा - वाकून केलेला नमस्कार ▪ पवन - वारा ▪ संचार - वाहणे ▪ घमघमले - दरवळले ▪ अत्तर - सुवासिक तेल ▪ अष्टदिशा - आठ दिशा ▪ अभीष्टचिंतन - शुभ होण्याची इच्छा व्यक्त करणे ▪ सर - पाऊस ▪ जयजयकार - जयघोष

## टीपा :

नचिकेत - उद्दालक (वाजश्रवस) व विश्ववरादेवी यांचा विद्वान पुत्र. उद्दालकाने यज्ञात नचिकेताला यमाला दान दिले. नचिकेताने यमाकडून आत्मज्ञान मिळवले. या ठिकाणी प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन गवताचे पान उगवून आले म्हणून त्यास नचिकेत म्हटले आहे.

### स्वाध्याय

प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) 'सत्कार' कोणाचा होत आहे ?
(2) सुकता सुकता नद्या काय म्हणाल्या ?
(3) कोणती ललकार स्फुरली होती?
(4) स्वागतगीत कोणी म्हटले ?
(5) मुजरा कोणी केला ?
(6) हया ठिकाणी गुलाल कोणता आहे ?
(7) गुलाल कोणी उधळला ?
(8) अत्तर म्हणजे काय असावे ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्र.2 खालील ओळींत रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(1) उरि जेव्हा ............
(2) सुकता सुकतां नद्या म्हणाल्या ............
(3) थरथरली स्फुरली होती हो ............
(4) भेदुनि आले ............
(5) ............ स्वप्नच अथवा अवचित हो साकार
(6) ............ श्रध्देचा अंकुर
(7) म्हटले ............ खगांनी
(8) ............ अभीष्टचिंतन घुमला जयजयकार
(9) घमघमले ............
(10) पहिल्या हिरव्या ............ आज असे सत्कार.

प्र.3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन-चार वाक्यात लिहा.

(1) धरतीने कसे व कोणते तप केले ?
(2) नचिकेताचे स्वप्न केव्हा साकार झाले ?
(3) कवीने जीवन साक्षात्कार कशाला म्हटले आहे ?

प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा.

(1) मातीची मृत्युवर मात म्हणजे काय?
(2) हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ?

प्र.5 खालील ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''सुकता सुकतां नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार''
(2) ''नचिकेताचे स्वप्नच अथवा अवचित हो साकार''
(3) ''लाल मातिचा गुलाल उधळित पवन करी संचार''
(4) ''अष्टदिशांतून अभीष्टचिंतन, घुमला जयजयकार''

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

प्र.6 खालील प्रश्नाचे सात ते आठ वाक्यात उत्तर लिहा.

(1) या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

## भाषाभ्यास

(1) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास लिहा.
विश्वसंहार, विजयध्वज, अष्टदिशा, अभीष्टचिंतन, ज्वालारस, स्वागतगीत, तृणपाते जीवनसाक्षात्कार

(2) समानार्थी शब्द लिहा
पक्षी, ढग

(3) अलंकार ओळखा व लक्षणे लिहा.
(1) मातीची ही मात मृत्युवर मृत्युंजय श्रद्धेचा अंकुर.
(2) लाल मातिचा गुलाल उधळित पवन करी संचार.
(3) घमघमले मातीतुनि अत्तर

## उपक्रम

- 'फुलराणी' ही बालकवीची कविता मिळवून वाचा.
- पहाटेच्या वेळी फेरफटका मारा व अनुभवलेल्या दृश्याचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| सुज्ञ | सून | सूर्य |
| शुचिर्भूत | पूर्व | आततायी |

****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# कविता-9 : नेनंता गुराखी

इंद्रजित भालेराव

G8G7L5

परिचय:

इंद्रजित भालेराव (1962) दूर राहिला गांव, जातं गाण गातं, हे त्यांचे कविता संग्रह. आम्ही काबाडाचे धनी, कुळंबिणीची कहाणी या त्यांचा दिर्घ कविता रानमळ्याची वाट, गावाकड चल माझ्या दोस्ता, हे बालकविता संग्रह. ग्रामीण दुःखाची नेमकी नाळ त्यांच्या कवितेला सापडली आहे. निसर्गाशी त्यांच्या कवितेचे एक छान नाते आहे. लोकवाङमयाचा उपजत रेखीवपणा, मायबोलीचा थेट जिव्हाळा माणसाच्या जगणातल्या वेदनेची खोल जाणीव या कवितेला आहे. तुकाराम आणि कबीराचा वारसा घेऊन आलेली ही कविता आहे.

प्रस्तुत कविता ‘आम्ही काबाडाचे धनी’ या त्यांच्या दीर्घ कवितेतून घेतलेला एक भाग आहे. अवघ्या महाराष्ट्रतील तमाम शेतकरी वर्गाचे दुःख यातून व्यक्त झाले आहे. लहानपणी चिखलाची गाई-गुरे बनवून खेळणाऱ्या कविचें बालपण बघता बघता संपले आणि बैलामागे रानात जनावरांना चरण्यास न्यावे लागले आणि तो नेनंता झाला त्याचे चित्रण कवी करतो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

चिखलाची गाय जव्हा मह्या हातातून गेली
तव्हा गुराख्याची काठी मह्या हातामधी आली
मव्हा लहानुसा जीव खंडीभर ढोरामागं
गाई पांगता जीवाची रागामुळं व्हई आग 1

दात खावून गाईची आशी बडविली पाठ
तरी भरती धानाला तिची वाकडीच वाट
आदळून आपटून जीव रंजीस आल्यावं
उगं रडत बसावं हात पाय गळाल्यावं 2

मही पाहून फजिती माय जात्यावर गाई
मह्यासटी रचलेली तिची एक एक वई
बाई नेनंता गुराखी ढोरं वळीतो गं कसे
रूंद पाठीच्या म्हशिवं जसा पालखीत बसे 3

बाई नेनंता गुराखी काट्याकुपाटीत जाय
काटेकुटे मुडपीती त्याचे निबरले पाय
बाई नेनंता गुराखी ढोर नाही का डिवत
नाही बाई गाय माय घेती कासंला हिवात 4

बाई नेनंता गुराखी कसा दिसना कोठंसी
झडपला पावसानं उभा गाईच्या पोटाशी
बाई नेनंता गुराखी कव्हा हासतो खेळतो
सदाकदा गोठ्यामधी गायगोऱ्हं चोंभाळीतो 5

बाई नेनंता गुराखी आला भागून शिनून
आनू कोठून वाढाया दूध भात ऊन ऊन
बाई नेनंता गुराखी कसा नाही झाला क्रिस्नं
त्याचं ऊन उतराया दूध मागते उसनं 6

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## शब्दार्थ व टीपा :

▪ जव्हा - जेव्हा ▪ मह्या - माझ्या ▪ तव्हा - तेव्हा ▪ खंडीभर - भरपूर ▪ पांगणे - विखुरणे ▪ धानाला - धान्याला ▪ वई - ओवी ▪ नेनंता - कोवळ्या वयाचा ▪ वळीतो - गुरे हाकतो ▪ काट्याकुपाटीत - काट्याकुट्यांतून ▪ काटेकुटे मुढपीती - काटेकुटे मोडणे ▪ निबरणे - घट्टे पडणे ▪ डिवत - डिवचणे ▪ चोंभाळीतो - सांभाळीतो ▪ क्रिश्न - कृष्ण ▪ ऊन - ऋण

## स्वाध्याय

प्र 1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) गायी कोण हाकतो आहे?

(2) गुराख्याची फजिती पाहून माय काय करते?

(3) गुराखी ढोरे कशी वळीतो?

(4) गुराख्याचे पाय कशाने निब्बर होतात?

(5) पावसाने झोडपल्यावर गुराखी कोठे उभा राहतो?

(6) गुराख्याला जेवू घालण्यासाठी काय हवे असे आईला वाटते?

प्र 2 खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(1) चिखलाची ................. जव्हा

(2) तिची ................. वाट

(3) बाई नेनंता .................

(4) ................. पालखीत बसे

(5) त्याचे निबरले .................

(6) उभा गाईच्या .................

(7) कसा नाही झाला .................

(8) ................. मागते उसनं

प्र 3 खालील प्रश्नांची उत्तरे  तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) गुराख्याची काठी नायकाच्या हातात केव्हा आली?

(2) गुराख्याच्या जीवाची आग का होते?

(3) गुराखी नेनंता झाला आहे असे आईला का वाटते?

प्र 4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) काठी हातात आल्यावर गुराख्याने काय केले?

(2) गुराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतों?

प्र 5 खालील ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

(1) गाई पांगता जीवची रागामुळं व्हई आग

(2) काटेकुटे मुडपीती त्याचे निबरले पाय

(3) सदाकदा गोठ्यामधी गायगोऱ्हं चोंभाळीतो

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्र 6 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ ओळीत लिहा.

(1) कवितेचा आशय सांगा.

(2) गुराख्याच्या कोणत्या गुणांचे वर्णन कवी करतो?

भाषाभ्यास

खालील वाक् प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(1) दात खाणे

(2) जीव रंजीस येणे

(3) हात पाय गळणे

(4) पावसाने झोडपणे

उपक्रम

- इंद्रजित भालेराव यांचे पीकपाणी व दूर राहिलं गांव हे कविता संग्रह मिळवून वाचा.
- ग्रामीण जीवन या विषयावर निबंध लिहा.

शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| उपस्थिती | कवयित्री | कुतूहल |
| पारंपरिक | बक्षीस | वाङ्मय |

***

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# कविता-10: धरण

दया पवार

परिचय :

दगडू मारुती पवार हे (1935-1996) दलित साहित्याच्या नव्या प्रवाहातील कवी व आत्मकथा लेखक. यांनी आपल्या लेखनातून दलितांच्या आशा आकांक्षा व वेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांचा 'चावडी' हा स्फुट लेखांचा संग्रह, 'कोंडवाडा' कविता संग्रह. 'बलुतं' आत्मकथा इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'बलुतं' या आत्मकथेसाठी महाराष्ट्र शासनाचा व फाय फाउंडेशन' चा पुरस्कार त्याना मिळाला आहे. भारत सरकारनेही त्याना 'पद्मश्री' हा किताब बहाल केला आहे.

'धरण' ही त्यांची लोकप्रिय कविता 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. या कवितेत कष्ट करुनही उपाशी राहणाऱ्या सामान्य कष्टकऱ्यांच्या भावना व्यक्त झाल्या आहेत. याचा वाङ्मयप्रकार 'दलित कविता' हा आहे.

(मूल्य - श्रमिकांची व्यथा)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

बाई मी धरण, धरण बांधिते ग
माझं मरण, मरण कांडिते ग
झुंजूमुंजू ग झालं
पीठ जात्यात आटलं
कणी कोंडा ग
कोंडा मी रांधिते ।।1।।

दिसं कासऱ्याला आला
जीव मागं घोटाळला
तान्हं लेकरु
लेकरु पाटीखाली मी डालते ।।2।।

काय सांगू उन्हाच्या झळा
घाव घालीत फुटे शिळा
कड दाटे कड दाटे
पायी पाला मी बांधिते ।।3।।

पेरापेरात साखर
तुमचं पिकलं शिवार
घोटभर पाण्यासाठी
सारं रान धुंडाळिते ।।4।।

वेल मांडवाला चढे
माझ्या घामाचे ग अळे
माझ्या अंगणी
अंगणी पाचोळा ग पडे ।।5।।

## शब्दार्थ व टीपा :

▪ धरण - नदीच्या पात्रात आडवी, मोठी भिंत बांधून पाण्याचा मोठा साठा केला जातो. ह्या पाण्याचा उपयोग शेती व उद्योगधंद्यासाठी केला जातो ▪ कांडणे - कुटणे ▪ रांधणे - स्वयंपाक करणे ▪ झुंजूमुंजू होणे - उजाडणे, पहाट होणे ▪ पीठ जात्यात आटणे - जात्यात पुरेसे धान्य न पडल्यामुळे पीठ कमी पडणे ▪ कणी कोंडा - कण्यांमध्ये कोंडा घालून दळलेले पीठ ▪ दिसं कासऱ्याला येणे - दुपार होणे, ▪ जीव घोटाळणे - मन गुंतणे ▪ तान्हे - लहान बाळ ▪ पाटी - वेताची मोठी बुट्टी ▪ डालते - झाकून ठेवते ▪ उन्हाच्या झळा - उष्णतेची तीव्रता ▪ घाव - आघात, प्रहार ▪ शिळा - दगड, खडक ▪कड दाटणे - रडू येणे ▪ पाला - झाडाची ओली पाने ▪ पेर - ऊसाचेकांड ▪ शिवार - शेत ▪ घोटभर - थोडेसे ▪ धुंडाळणे - शोधणे ▪ वेल मांडवाला चढणे - भरभराट होणे, प्रगती होणे ▪आळे - झाडाच्या बुंध्याभोवती पाणी साठण्यासाठी मातीने केलेली गोल खोलगट जागा.

### स्वाध्याय

**प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(1) या कवितेतील स्त्री काय बांधत आहे ?
(2) तिने आपले तान्हे लेकरु कोठे ठेवले आहे ?
(3) ती आपल्या पायाला काय बांधते ?
(4) ती स्त्री रान का धुंडाळते ?
(5) वेल कोठे चढते ?
(6) साखर कशामध्ये भरली आहे ?
(7) पाचोळा कोठे पडत आहे ?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्र.2 खालील ओळीत रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(1) या कवितेतील स्त्री ............ बांधत आहे.
(2) या कवितेतील कष्टकरी स्त्री ............ कांडत आहे.
(3) पाटीखाली तिने ............ ठेवले आहे.
(4) उन्हाचे चटके बसू नयेत म्हणून तिने पायाला ............ बांधला आहे.
(5) पेरापेरात साखर, तुमचं पिकलं ............

प्र.3 खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

(1) 'जीव मागे घोटाळला' असे ती का म्हणते ?
(2) 'पीठ जात्यात आटलं' याचा अर्थ स्पष्ट करा
(3) धरण बांधताना तिने कोणते कष्ट सोसले ?
(4) कामावर जाण्यापूर्वी पहाटेला ती कोणती कामे करते ?
(5) कष्ट करुन शिवार पिकविणाऱ्या स्त्रीला घोटभर पाणी का मिळत नाही ?

प्र.4 खालील ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''झुंजूमुंजू ग झालं, पीठ जात्यात आटलं''
(2) ''दिसं कासऱ्याला आला, जीव मागे घोटाळला''
(3) ''पेरापेरांत साखर तुमचं पिकलं शिवार''
(4) ''वेल मांडवाला चढे, माझ्या घामाचे ग आळे''

प्र.5 खाली दिलेल्या प्रश्नांचे उत्तर पाच सहा वाक्यात लिहा.

(1) या कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे?

प्र.6 खालील प्रश्नाचे उत्तर सात आठ वाक्यात लिहा.

या कवितेचा सारांश सात ते आठ ओळीत लिहा.

भाषाभ्यास

(1) खालील ओळीतील अलंकार ओळखा व लक्षणे लिहा.
(1) ''धरण बांधते ग, माझे मरण कांडते ग''.
(2) ''काय सांगू उन्हाच्या झळा, घाव घालीत फुटे शिळा''.
(3) ''वेल मांडवाला चढे, माझ्या घामाचे ग अळे''

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

(2) खालील वाक् प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

झुंजूमुंजू होणे

दिसं कासऱ्याला येणे

जीव घोटाळणे

वेल मांडवाला चढणे

कड दाटणे

(3) विग्रह करून समास ओळखा, प्रकार लिहा.

(1) पेरापेरांत (2) कणी कोंडा

उपक्रम

- 'या हो सूर्यनारायणा' ही इंदिरा संतांची कविता मिळवून वाचा.
- ''धरणग्रस्तांचे मनोगत'' यावर निबंध लिहा.

शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| टिपण, | तारीख | तीर्थरूप |
| टीका | दक्षिणा | ग्रामीण |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

# कविता–11: सुन्या तिच्याही दाही दिशा

**अनुराधा पाटील**

**परिचय :**

अनुराधा कौतिकराव पाटील (जन्म 1954) या अलिकडच्या काळातील लक्षणीय कवयित्री आहेत. 'दिगांत', 'तरीही', दिवसेंदिवस हे काव्यसंग्रह प्रकाशित. ग्रामीण संस्कृतीच्या परंपरेने संस्कारित झालेली, तरीही जीवनाबद्दलचा आधुनिक दृष्टिकोन व्यक्त करणारी अशी त्यांची कविता आहे. आपल्याला हवे असलेले जगणे आपल्या वाटयाला न येणे. यामुळे निर्माण होणारे दुःख हे त्यांच्या कवितेचे सूत्र आहे. वरवर पाहता सुबोध वाटणारे त्यांच्या कवितेचे शब्दरूप अंतिमतः त्यांच्या भाववृत्तीच्या सूक्ष्म तरल स्वरूपाकडे लक्ष वेधणारे असते.

स्त्री जन्माची करुण कहाणी कवयित्रीने या कवितेत प्रत्ययकारी भाषेत सांगितली आहे. न संपणारे काबाडकष्ट व हालअपेष्टा सोसूनही ती आशावादीच आहे. 'कणी कोंडा' पाखडून सत्व उचलण्याची जीवट सवय'' बाळगून असलेल्या हया स्त्रीला 'दाही दिशा मात्र सुन्या सुन्याच आहेत ही कविता 'तरीही' या काव्यसंग्रहातून निवडली आहे. ह्या कवितेचा प्रकार 'सामाजिक कविता' हा आहे.

**(मूल्य – स्त्री समस्या)**



NOT TO BE REPUBLISHED @KTBS

माझ्या डोळ्यांसमोरुन सरकत जातात
चार दोन उदास झाडांनी वेढलेली गावं
आणि भरदुपार डोक्यावर घेत
पाणी वाहणाऱ्या बायांची रांग
सगळे ऋतू घेऊन येतात त्यांच्यासाठी
न संपणाऱ्या कष्टांची माळ,
फुपाटा भरलेल्या चाकोऱ्यांतून
चालता चालता वाटते त्यांना
फिटेल अशा जगण्याचाही पांग
रसरसून तेजाळते त्यांच्या
कोणत्याही दुःखांची ज्योत
असह्य ठणका आयुष्याचा
कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ
चुलीतल्या लाकडानं चुलीत जळावं
म्हणताना घुसमटतात जीव
समृद्ध होतो पुन्हा पुन्हा
एखाद्या भरल्या विहिरीचा तळ.
अनाठायी आयुष्य गेल्याची
बोच त्यांना घेरत नाही
वाळू मधल्या झिऱ्यासारखा
पाझरतो जीवन रस
कितीदा मरुन पुन्हा उठते
कुणी एखादी पारु, कुणी एखादी राही
कणी कोंडा पाखडून
सत्व उचलण्याची जीवट सवय
आणि एक दीर्घ उसासा उद्यासाठी
दुःख पुरुन ठेवतात मातीखाली
आणि स्वतःलाच समजावतात

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तांब्याभर पाण्याचा विसावा
कुणीतरी असावं पाठीपोटी
माझ्यापेक्षा वेगळी नसते
पायांना पानं बांधून वाट तुडवणारी
तिथली कोणतीही आई
जाळणारा तिला संसाराचा वणवा
तिचेही हात रिकामे अवकाश कवळून

**शब्दार्थ व टीपा :**

▪ उदास - निराश ▪ कष्टांची माळ - एका मागून एक येणारी संकटे ▪ फुपाटा - तापलेली माती ▪ पांग फिटणे - कष्टाचे सार्थक होणे ▪ असह्य - सहन न होणारे ▪ आयुष्याचा ठणका - सतत होणारे, दुःख ▪ ठणका - वेदना ▪ घुसमटणे - कोंडमारा होणे ▪ समृद्ध - परिपूर्ण ▪ बोच - सल, दुःख ▪ झिऱ्या - झरा ▪ सुन्या - रिकाम्या ▪ पाझरणे - झिरपणे ▪ कणी कोंडा पाखडणे - खूप कष्ट करणे ▪ सत्व उचलणे - उत्कृष्ट ते निवडणे ▪ जीवट - जीवनाला लागलेली ▪ विसावा - विश्रांती ▪ उसासा - खोल निःश्वास ▪ पाठी पोटी असणे - आधार असणे ▪ वणवा - जंगलातील आग ▪ अवकाश - अंतराळ, आकाश ▪ जीवनरस - जगण्याची दुर्दम्य इच्छा, ▪ उसासा - सुस्कारा, ▪ अनाठायी - कारण नसताना, निरर्थक, ▪ चाकोरी - मळलेली वाट.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

(1) गाव कशानी वेढलेले आहे ?
(2) भरदुपारी कुणाची रांग लागते ?
(3) न संपणाऱ्या कष्टाची माळ कोठून जाते ?
(4) दुःखाची ज्योत कशी तेजाळते ?
(5) चुलीतल्या लाकडाने कुठे जळावे ?
(6) त्यांना कोणती बोच घेरत नाही ?
(7) दुःख कुठे पुरुन ठेवतात ?
(8) पायाना त्या काय बांधून वाट तुडवितात ?

**प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(1) माझ्या ............ समोरुन सरकत जातात.

(2) सगळे ............ घेऊन येतात त्यांच्यासाठी न संपणाऱ्या कष्टाची माळ.

(3) वाळू मधल्या झिऱ्यासारखा पाझरतो ............

(4) कणी कोंडा पाखडून ............ उचलण्याची जीवट सवय.

(5) पायांना पानं बांधून वाट तुडवणारी तिथली कोणतीही ............

**प्र.3 खालील प्रश्नांची तीन ते चार ओळीत उत्तरे लिहा.**

(1) सगळे ऋतू त्यांच्यासाठी काय आणतात ?

(2) चालता चालता त्याना काय वाटते ?

(3) जीवनाचा असह्य ठणका थांबविण्यास काय आणतात ?

(4) कोणती सवय त्या बायांना आहे ?

(5) कोणता विसावा, त्यांना कशासाठी हवा ?

(6) तिच्या संसाराला वणवा का म्हटले आहे ?

**प्र.4 खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे द्या.**

(1) स्त्रियांच्या कष्टांना कष्टांची माळ का म्हटले आहे ?

(2) स्त्रिया स्वतःला कसे समजावतात ?

(3) अवकाश कवळून तिचे हात रिकामे असे का म्हटले आहे ?

**प्र.5 खालील ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''चालता चालता वाटते त्यांना फिटेल अशा जगण्याचाही पांग''.

(2) ''कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ''.

(3) ''कुणी एखादी पारू, कुणी एखादी राही''.

(4) ''समृद्ध होतो पुन्हा पुन्हा एखाद्या भरल्या विहिरीचा तळ''.

(5) ''जाळणारा तिला संसाराचा वणवा''.

**प्र.6 खालील प्रश्नाचे सात ते आठ ओळीत उत्तर लिहा.**

(1) 'सुन्या तिच्याही दिशा दाही' या कवितेचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भाषाभ्यास**

(1) खालील वाक्प्रचारांचा अर्थसांगून वाक्यात उपयोग करा.
पांग फेडणे, कणी कोंडा पाखडणे, वाट तुडवणे

(2) अलंकार ओळखून लक्षणे सांगा.
वाळू मधल्या झिऱ्यासारखा पाझरतो जीवन रस.

(इ) विग्रह करुन समास ओळखा.
असह्य, जीवनरस, पाठीपोटी

**उपक्रम**

- 'भयचकित नमावे तुज रमणी' ही भा.रा. तांबे याची कविता वाचा.
- 'अरे संसार संसार' ही बहिणाबाई चौधरी यांची कविता वाचा.

**शुद्धलेखन :**

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| दैनंदिनी | नैसर्गिक | द्विगुणित |
| धैर्यशाली | कैफियत | अनुभूती |

*****

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# कविता-12: पाठ आणि पोट यांचा झाला टाळ

B5Q9F5

विंदा करंदीकर

परिचय :

विंदा करंदीकर (1918-2010) पूर्ण नाव गोविंद विनायक करंदीकर मराठीतील ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी. इंग्रजीचे प्राध्यापक. स्वेदगंगा हा त्यांचा पहिला कविता संग्रह. त्यानंतर मृदगंध, धृपद, जातक, विरूपिका हे त्यांचे इतर कविता संग्रह. राणीचा बाग, एकदा काय झालं, परी ग परी, बागुलबुवा वगैरे बालकविता संग्रह, परंपरा आणि नवता, ॲरिस्टाटलचे काव्यशास्त्र वगैरे समीक्षा ग्रंथ. असे विपुल साहित्य त्यांनी लिहिले त्यांच्या समीक्षा व काव्यग्रंथांचे गुजराथी, इंग्रजी, हिंदीत अनुवाद झाले असून महाराष्ट्र शासनाचे दहा पुरस्कार, सीनिअर फुलब्राईट पुरस्कार, कबीर-पुरस्कार, कोनार्क पुरस्कार, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची डि. लिट् अशा अनेक पुरस्कारानी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. आपल्या बहुतेक पुरस्कारांची मिळालेली रक्कम त्यांनी समाजातील विविध संस्थांना वाटून टाकली.

प्रस्तुत कविता त्यांच्या धृपद या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

भूक हे जगातले एकमेव सत्य. त्यासाठी माणूस वाट्टेल ते करण्यास तयार होतो. पण परमेश्वर मायाळू आहे, मग त्याने आपली भूक का शमवू नये? खपाटीला गेलेली पोटे घेऊन विठ्ठलाचे नामस्मरण होत नाही. आणि भूकेल्या माणसाला देवरक्तही वर्ज्य नसते. एकतर त्याने भूक शमवावी आपले देवपण दावावे, नाहीतर माथ्यावर पडलेले घणाचे घाव निमूटपणे सोसण्यास तयार व्हावे असे कवी म्हणतो.

विठ्ठला विठ्ठला । भाकरी गा होई,
पोटामध्ये येई । शांतवाया.
आम्ही भुकी पोरे । सैरावैरा धावूं
एकमेका खाऊ । धन्य माया !

आम्ही भुके जीव । देतसूं इशारा;
आमच्या पुढारा । नको येऊ.
विठ्ठला, विठ्ठला । आम्ही अन्नभक्त;
आम्हां देवरक्त। वर्ज्य नाहीं.

उठ उठ विठ्या । दाव देवपण;
नाही तरी घण । तुझ्या माथी.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

माझ्या पोटी भूक। तुझ्या पोटीं माया;
मग हा कासया। गदारोळ
पाठ आणि पोट । यांचा झाला टाळ;
अभंगाचे बळ। अमर्याद.

## शब्दार्थ व टीपा :

▪ शांतवाया - शांत करणे, शमविणे ▪ सैरावैरा - चोहोकडे ▪ इशारा - सूचना ▪ पुढारा - पुढे. ▪ वर्ज्य - त्याज्य ▪ घण - मोठा हातोडा ▪ कासया - कशाला ▪ गदारोळ - गोंधळ ▪ अमर्याद - मर्यादा नसणारे ▪ बळ - शक्ती

### स्वाध्याय

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) भुकेलेली पोरे कशी धावतात?

(2) भुकेलेले जीव काय देतात?

(3) भुकेलेल्या पोटांना काय वर्ज्य नाही?

(4) विठ्ठलाला पोरे काय दाखव अशी विनवणी करतात?

(5) विठ्ठलाच्या पोटी काय आहे?

प्र.2 खालील ओळीत रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(1) पोटामध्ये येई। .......

(2) आम्ही भुके जीव । देतसूं.......

(3) ऊठ ऊठ......। दाव देवपण;

(4) मग हा....। गदारोळ ?

(5) अभंगाचे बळ । ........

प्र.3 खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) भुके जीव काय काय करतील असे कवी म्हणतो?

2) या कवितेत विठ्ठलाला कोणती विनवणी केली आहे?

प्र.4 खालील आळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

1) आम्ही भुके जीव । देतसुं इशारा
आमच्या पुढारा । नको येऊ.

2) पाठ आणि पोट । यांचा झाला टाळ
अभंगाचें बळ । अमर्याद

प्र.5 खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.

या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

भाषाभ्यास

(1) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

सैरावैरा धावणे,

इशारा देणे.

(2) विग्रह करून समास ओळखा, प्रकार लिहा.

अन्नभक्त

देवरक्त

उपक्रम

- विंदा करंदीकरांचे बाल कविता संग्रह मिळवून वाचा.
- तुकारामांचे अभंग मिळवून वाचा.

शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| सैरावैरा, अन्नभक्त कासया, गदारोळ |
|---|

******

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# अर्ज लेखन

द्वारा
श्री प्रसाद एस्.जी,
विद्यार्थी प्रतिनिधी,
आझाद रोड, अथणी.

दि.

प्रति :

मा. डेपो मॅनेजर,
अथणी आगार,
विषय - बसगाडया वेळेत सोडण्याबद्दल
महोदय,

मी न्यू इंग्लिश स्कूल, अथणीचा विद्यार्थी प्रतिनिधी विनंती करतो की आपल्या आगारातून जाणाऱ्या बडची, यल्लडगी, शिनाळ, हुलगबाळी या बसेस कधीही वेळेवर सुटत नाहीत. या बससाठी विद्यार्थ्यांनी पास काढले आहेत. बसेस वेळेवर जात नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांना विशेषतः विद्यार्थिनींना घरी पोहोचण्यास रात्री 8 वाजतात. त्यामुळे गैरसोयही होते व अभ्यासही होत नाही. तरी सर्वांच्यावतीने आपणास विनंती करतो की कमीत कमी परत जाणाऱ्या बसेस तरी सांयकाळी 6 वाजेपर्यंत सुटाव्यात म्हणजे विद्यार्थ्यांचे नुकसान टळेल. तरी योग्य ती कारवाई कराल ही अपेक्षा. याबाबत मी मुख्याध्यापकांशी बोललो आहे.

कळावे,

आपला नम्र,
श्री प्रसाद .एस्.जी.
विद्यार्थी प्रतिनिधी

मे.जा. व्हावे,
प्रति
मा. डेपो मॅनेजर,
अथणी आगार,
अथणी,
ता. अथणी, जि. बेळगावि.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

तुम्ही एस्. एस्. एल्. सी. उत्तीर्ण झाला आहात. तुम्हाला पुढील शिक्षणासाठी शाळा सोडल्याचा दाखला हवा आहे. तो मागणी करणारा अर्ज मुख्याध्यापकांना लिहा.

द्वारा<br>
वैजनाथ. व्ही. जी.<br>
निपाणी,<br>
ता. चिकोडी-जि. बेळगांवी,<br>
पिन. 591215<br>
दि. 7 जून 2014

प्रति,

मा. मुख्याध्यापक,<br>
न्यू इंग्लिश स्कूल, सिदनाळ.<br>
विषय - शाळा सोडल्याचा दाखला मिळणे बद्दल.<br>
महोदय,

मी आपल्या शाळेचा विद्यार्थी असून के.एस्.ई.ई. बोर्डाने एप्रिल 2013 मध्ये घेतलेल्या एस्.एस्.एल्.सी. परीक्षेत उत्तीण झालो आहे. पुढील शिक्षण घेण्याचा माझा मनोदय आहे. तरी मला माझा शाळा सोडल्याचा दाखला लवकरात लवकर देणेची कृपा करावी.

कळावे,

धन्यवाद,

आपला आज्ञाधारक विद्यार्थी,<br>
वैजनाथ. व्ही.जी.

लिफाफयावरीळ पत्ता

प्रति<br>
मा. मुख्याध्यापक,<br>
न्यू इंग्लिश स्कूल, सिदनाळ,<br>
ता. चिकोडी, जि. बेळगांवी, .<br>
पिन 591211.

पोस्टाचे तिकिट

~~~*~~~*~~~*~~~

© KTBS NOT TO BE REPUBLISHED
~~~

# निबंध लेखन
# आपले राष्ट्रीय सण

मनुष्य हा उत्सवप्रिय आहे. तो वर्षातून अनेक सण साजरे करत असो. सणादिवशी गोडधोड करुन आनंद व्यक्त करतो. सण म्हणजे उत्सवाचा दिवस होय. ग्रामदेवतेच्या जत्रेच्या दिवसालाही सणच म्हणतात. सणाचे प्रकार दोन आहेत.

1) धार्मिक सण 2) राष्ट्रीय सण

गुढी पाडवा, अक्षय तृतीया, बेंदूर, नागपंचमी, गणेश चतुर्थी, दसरा, दीपावली, ईद, मोहरम, ख्रिसमस, पोंगल इ. धार्मिक सण आहेत तर -

26 जानेवारी, 15 ऑगष्ट हे प्रमुख राष्ट्रीय सण असून 14 एप्रिल, 5 सप्टेंबर, 2 ऑक्टोबर, 14 नोव्हेंबर हे ही दिवस राष्ट्रीय सण म्हणून साजरे केले जातात.

15 ऑगष्ट 1947 ला भारत 150 वर्षाच्या इंग्रजाच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक देशभक्तांनी प्राणाचे बलिदान केले. भारतमाता गुलामगिरीतून मुक्त झाली म्हणून हा दिवस देशभर साजरा केला जातो.

26 जानेवारी 1950 ला भारताने घटनेचा स्वीकार केला. त्या दिवशी भारत प्रजासत्ताक बनला. याला 'गणतंत्र दिनही म्हणतात. प्रजेच्या म्हणजे लोकांच्या हाती सत्ता येऊन भारतात लोकशाही राज्याला सुरुवात झाली. लोकांचे, लोकांकडून, लोकाकरिता चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. म्हणून हा दिवस आज ही साजरा केला जातो.

14 एप्रिल हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन होय. त्यांनी अनेक लोकशाही राष्ट्रांच्या घटनेचा अभ्यास करुन राजहंसा-प्रमाणे नीरक्षीर वृत्तीने चांगल्या तत्वांचा समावेश करुन घटना तयार केली त्यांना घटनेचे शिल्पकार म्हणतात. शोषित व पीडितांच्या जीवनात त्यांनी क्रांती घडवून आणली. म्हणून या दिवसालाही महत्व आहे.

5 सप्टेंबरला भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिन होय. ते तत्वज्ञानाचे प्राध्यापकही होते. देशाचे आधारस्तंभ घडविणाऱ्या शिक्षकांना सन्मान मिळावा म्हणून आपला जन्मदिन 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्यास त्यांनी सांगितले.

2 आक्टोबर हा महात्मा गांधीजींचा जन्मदिन होय. सत्य, अहिंसा, शांतीच्या मार्गानी त्यांनी स्वातंत्र्यलढा दिला. त्यांना 'राष्ट्रपिता' असेही संबोधले जाते. याच दिवशी लालबहाद्दर शास्त्री यांचाही जन्म दिवस साजरा केला जातो त्यानी 'जय जवान जय किसान' हा नारा दिला. 'मूर्ती लहान पण किर्ती महान' असे त्यांच्या विषयी म्हटले जाते. ते भारताये पंतप्रधान होते. त्यांच्या विचाराचा प्रभाव जगभर पसरला.

14 नोव्हेंबर हा पंडित जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिन होय. ते भारताचे पहिले पंतप्रधान होते. त्यांना मुले फार आवडत. मुले त्यांना 'चाचा' म्हणत. त्यांनी आपला जन्मदिवस 'बालदिन' म्हणून साजरा करण्यास सांगितले. म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

असे हे आपले राष्ट्रीय सण आहेत. त्यामुळे सर्व भारतीयात प्रेम, बंधुता, सहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. म्हणून हे राष्ट्रीय सण आपण साजरे केले पाहिजेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# विचारधन – भाग – 1
# ‘स्त्री भ्रूण’ हत्येचा निषेध करणारे
# जन्माला न आलेल्या मुलीचे आईस पत्र

प्रिय आईस,

मी एक खळबळजनक बातमी ऐकली, तुझ्या उदरात मुलीचा अंकुर वाढतोय हे जेव्हा तुला समजले, त्याक्षणीच तू मला या कोवळ्या जीवास-जगात येऊ न देण्याचा निर्णयही घेतलास ? माझा विश्वासच बसत नाही. माझी सहृदय आई असे करु शकते ?

शरीरात तुझ्याच रक्तामांसात वाढणारी, तुझ्या शरीराचा एक भाग असणारी मी तुझी मुलगी, तिला तू नष्ट करायला निघालीस ? आई, मी या जगात येऊ नये म्हणून तू जे औषध घेणार आहेस ना त्या औषधाने माझा जीव गुदमरेल गं ! खूप वेदना होतील मला. मी फक्त तड्फडत राहीन. हे औषध निर्दयीपणे हिंस्त्रश्वापदासारखे माझ्यावर हल्ला करुन तुझ्या उदरातून सहजपणे मला वेगळे करेल. हे दृश्य तुझ्या उघड्या डोळ्यांनी तू बघू शकतेस ? तुझे मन अस्वस्थ होणार नाही ? तुझे काळीज पिळवटून टाकणारा निर्णय तू कसा घेऊ शकतेस ?

आई, मला माहीत आहे की हा निर्णय पूर्णपणे तुझा नाही. पुरुषप्रधान संस्कृतीचा हा निर्णय आहे. माझे वडील, हे तज्ज्ञ पण निर्दयी डॉक्टर आणि स्त्रीला दुय्यम स्थान देणारा हा समाज अधिक दोषी आहे. आई मला जन्माला येण्याची खूप इच्छा आहे गं ! तुझ्या अंगाखांद्यावर, खेळायचे आहे. अंगणात पैंजण घालून छुम छुम आवाज करत नाचायचे आहे मला. तुझ्या प्रेमाचा स्पर्श अनुभवायचाय मला. आई मला पायातले पैंजण, सोन्याच्या कुडया, नवीन कपडे काही नको. फक्त एकवेळ मला तुझ्या या पवित्र उदरातून बाहेर येऊन मुक्तपणे श्वास घ्यायची संधी दे. निळ्या आकाशात झगमगणाऱ्या ताऱ्यांचा आनंद, सृष्टीतील नवचैतन्य मला अनुभवू दे त्याचा आनंद मला घेऊ दे.

आई, मुलगी म्हणून मला झिडकारतेस ? हुंडयासाठी घाबरतेस ? आई, ती वेळच येणार

नाही ग! मी शिकून मोठी होईन, स्वतःच्या पायावर उभी राहून स्वावलंबी होईन, माझ्या हाताला मेंदी लावली जाईल आणि मी नवरी होईन, चिमणीसारखी भुर्रकन उडून जाईन पण आता तू मला अंगणात येण्याचे नाकारु नकोस ‘मुलगाच हवा’ या हट्टापायी माझा-निरागस निरपराध-मुलीचा बळी देऊ नकोस

गं ! तुझ्या वेलीवरच्या कळीला फूल बनण्या आधीच तोडू नकोस गं ! कृपा करुन आई मला

वाचव गं !

कळावे,

तुझी,
जन्माला न आलेली
लेक

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# विचारधन - भाग - 2

1) आज भारत देशातील श्रेष्ठ व्यक्तिंचेकडून आयुष्याचा अर्थ नि व्यवहाराचे नियम जाणून घ्यावेत, राष्ट्रीय एकात्मता, धर्म, वर्ण, पंथ, जात काहीही असो, व्यक्तीचे जीवन यशस्वी करणारी संघर्षरहित अशी आदर्श समाज व्यवस्था आवश्यक असते. जगातील महासत्ता आणि देश आज शांतीच्या शोधात आहेत. अनादि कालापासून भारतभूमी ही शांतिभूमि आहे. भारतावर अनेक परकीयांनी आक्रमणे केली. त्यांच्या संस्कृतीचा ध्वज चालविला पण भारताने मात्र अशी आक्रमणे कधीच दुसऱ्यावर केली नाहीत. इतर राष्ट्रांना शांतीचा संदेश देण्यासाठी आणि जीवनाचे उच्च ध्येय समजावून सांगण्यासाठी आपणच आजपावेतो शांतिदूत पाठविले आहेत. आजही आपण तेच करीत आहोत. संघर्ष विरहित समाज व्यवस्था हे भारताने जगाला दिलेले सर्वात अप्रतिम आणि अमूल्य असे देणे असेल..... जेव्हा राष्ट्रात वावरणारा समाज खंबीर आणि बलशाली असतो तेव्हाच राष्ट्र खंबीर आणि बळकट बनते.

2) जन्मभर आपण वृक्षांच्या आधारे जगतो आणि मृत्यूनंतरही एक वृक्ष आपण घेऊन जातो. तेव्हा जन्मापासून मरणानंतरही साथ देणाऱ्या या वृक्षांची आपण जाण ठेवली पाहिजे. यासाठी प्रत्येक व्यक्तिने आपल्या आयुष्यात निदान दोन चार तरी झाडे लावून ती मोठी करण्याचे सत्कार्य केले पाहिजे. त्यामुळे पर्यावरणाचे ही संरक्षण होणार आहे.

"वृक्ष आमुचा प्राणसखा - घाव तयावरी घालू नका"

3) प्रगतीसाठी लावलेल्या शोध आज माणसाला अधोगतीकडे घेऊन जात आहेत. आपण लावलल्या शोधाचा खरा आणि योग्य उपयोग कसा करावयाचा ही सारासार विचारशक्तीच माणूस गमावून बसला आहे. स्वतःपलीकडे जाऊन इतरांच्या सुखाचा. भावनांचा विचार करणे आजच्या म नुष्याच्या विचार प्रणालीत बसत नाही. म्हणून हा माणूस फक्त स्वतःवर आणि स्वतःच्या सत्तेवर प्रेम करतो, हीच शोकांतिका आहे. 'हे विश्वचि माझे घर' ही भारतीय संस्कृतीने आपणास शिकवण दिली ती दिवसेंदिवस लोप पावत चालली आहे. 'ज्याचे हातात ससा तो पारधी', ही सध्याची वस्तुस्थिती आहे.

~~~\*~~~\*~~~\*~~~

© KTBS NOT TO BE REPUBLISHED
~~~

# शब्दसंग्रह

| अ | | |
|---|---|---|
| अवसर | - | वेळ |
| अवगत होणे | - | मिळविणे, साध्य होणे |
| अळणी | - | बेचव |
| अपरिहार्य | - | नाईलाज |
| अलौकिक | - | तेजस्वी |
| अडसर | - | दाराचा अडणा |
| अवसान जाणे | - | धीर नाहीसा होणे |
| अब्यास | - | अभ्यास |
| अधःपतन होणे | - | दर्जा घसरणे |
| अनुसरती | - | त्याप्रमाणे वागणे |
| अगाध | - | खूप मोठे |
| अवधान | - | लक्ष |
| अनन्या | - | दुसऱ्या कोणाला नाही |
| अनाठायी | - | निरर्थक |
| अस्पृश्यता | - | जातिभेद |
| अवचित | - | अचानक |
| अभीष्टचिंतन | - | शुभ होण्याची इच्छा व्यक्त करणे |
| अत्तर | - | सुवासिक तेल |
| अष्टदिशा | - | आठ दिशा |
| अभिषेक | - | संततधार |
| असह्य | - | सहन न होणारे |
| अवकाश | - | अंतराळ |
| अलंकारणे | - | शृंगारणे |

| आ | | |
|---|---|---|
| आत्मसिद्धी | - | स्वार्थ |
| आरमार | - | नौदल |
| आवर्तन | - | पुन्हा पुन्हा म्हणणे |
| आर्जविणे | - | विनविणे |
| आंचळ | - | गाईचे, म्हशीचे स्तन |
| आखाडा | - | कुस्ती खेळण्याची जागा |
| आडसरी | - | जुन्या काळातील धान्य मोजण्याचे माप |
| आग | - | ज्वाला, रग, |
| आत्माहुती | - | आत्मबलिदान |
| आमराई | - | आंब्याची बाग |
| आळी | - | गल्ली |
| आयतं | - | सहज |
| आयुष्याचा ठणका | - | सतत होणारे दुःख |

| इ | | |
|---|---|---|
| इचार | - | विचार |
| इज | - | वीज |

| ई, उ | | |
|---|---|---|
| उबळ | - | ठसका |
| उसासा | - | दीर्घ श्वास, सुस्कारा |
| उदास | - | निराश |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| उदर | - | पोट |
| उपरती | - | पश्चाताप |
| उमाळे | - | आवेग, जोर |
| उपाधि | - | पदवी |
| उरी | - | छातीवर |
| उणीव | - | कमतरता |
| उरोधिती | - | आपलेच म्हणणे खरे म्हणून वाद घालणे |
| उसासा | - | नि:श्वास |
| उदात्त | - | पवित्र |
| उत्कांती | - | सावकाश होत जाणारा बदल |
| उजेड वाटा | - | इतराना उजेड देण्यास वाट निर्माण करणे |
| उद्वीग्न | - | वैताग, चीड |
| उद्युक्त | - | तयार |
| उंडी | - | गोळा |
| उल्काफुले | - | चांदण्या रुपी फुले |
| **ऊ, ऋ** | | |
| ऋचते | - | आवडे |
| **ए, ऐ, ओ** | | |
| ओटा | - | घरापुढील कट्टा |
| ओसरी | - | पडवी, सोपा |
| ओटी | - | पोटावर बांधलेले पेरणीचे धान्य, खोळ. |
| **औ,अं, अः** | | |
| अंकुर | - | कोंब |

| | | |
|---|---|---|
| अंमल | - | वर्चस्व |
| अंदाज | - | अदमास |
| **क** | | |
| कण्हणे | - | विव्हळणे |
| कळंजणे | - | निराश होणे |
| कणगी | - | धान्य ठेवण्याची वेताची टोपली |
| कड | - | वेदना |
| कल्पतरु | - | इच्छा पूर्ण करणारा वृक्ष |
| कल्पनातीत | - | कल्पनेच्याही पलिकडचे |
| कक्षा | - | मर्यादा |
| कमंडलू | - | लाकूड, माती किंवा धातूचे उभट भांडे |
| कवच | - | जमिनीचा वरचा भाग |
| कस्तुरी | - | हरिणाच्या नाभीतील सुगंधी गाठ |
| कपाशी | - | कापूस |
| कणीकोंडा | - | कण्यामध्ये कोंडा घालून दळलेले पीठ |
| कड दाटणे | - | रडू येणे |
| काट मोठा करने | - | खूप कष्ट करणे |
| कासारपण | - | बांगड्या भरण्याचा व्यवसाय |
| कातरु | - | चुकार |
| काजवा | - | रात्री प्रकाशणारा कीटक |
| कायी | - | काय |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| काजळीकोपरे | - | निराशा |
| काटा पायातरूतणे | - | दु:ख होणे |
| कामिनी | - | सुंदर स्त्री |
| कुमक | - | सैन्य, इतरांचे पाढवळ |
| कुल्फी | - | काडीला लावलेला बर्फाचा गोड गोळा |
| कुन्हा | - | मत्सर |
| कुतुक | - | कौतुक उत्सुकता, कुतूहल |
| कोथळा | - | पोट |
| कोंडमारा होणे | - | उघडपणे सांगता न येणे |
| कोंदला | - | भरुन राहिला |
| कोटिदीपज्योतिशा | - | कोटी दीप लावल्याप्रमाणे |
| क्रांती | - | अचानक होणारा मोठा बदल |
| **ख** | | |
| खराटा | - | नारळाच्या झा-वळयापासून बनवलेला झाडू |
| खटले | - | कुटुंब |
| खल | - | दुष्ट |
| खग | - | पक्षी |
| खुरटणे | - | वाढ खुंटणे |
| खुष्की | - | जमीनीवरील मार्ग |
| **ग** | | |
| गलका | - | गोंधळ |
| गहिवरणे | - | मन भरुन येणे |
| गारवा | - | थंड जागा |
| गाऱ्हाणी | - | तक्रारी |
| गुरकावणे | - | भेडसावणे, दरडावणे |
| गुरफटणे | - | गुंतणे |
| गुत्ता घेणे | - | ठेका घेणे |
| गोठी | - | गोष्टी |
| **घ** | | |
| घमेंड | - | गर्व, ताठा, नक्षा |
| घमघमले | - | दरवळले |
| घाव | - | आघात, प्रहार |
| घासलेट | - | रॉकेल |
| घुंगुरटी | - | चिलटे, मुरकेट |
| घुसमटणे | - | कोंडमारा होणे |
| घोटभर | - | थोडसे |
| घोळ | - | घोटाळा |
| घोटायाला | - | प्यायला |
| **ङ, च** | | |
| चळत | - | रास, ढीग |
| चिरगुटं | - | फाटकी वस्त्रं |
| चित्ते | - | मनाने |
| चुंबकू | - | सर्व गोष्टीत तोंड घालणारा |
| चेहरा बोहरणे | - | चेहरा काळवंडणे |
| चैतन्यशील | - | उत्साह, आनंद देणारी |
| चंचल | - | अस्थिर मनाचा |
| चंद्रमौळी | - | डोक्यावर चंद्र असणारा शंकर |

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| चकोरी | - | मळलेली वाट |
| **छ** | | |
| छकडा | - | सामान वाहण्याची गाडा |
| छळणे | - | त्रासदेणे, पीडा देणे |
| **ज** | | |
| जलसे | - | गाण्या बजावण्याची सभा |
| जाया | - | पत्नी, बायको |
| जटा | - | केसाची गुंतागुंत |
| जननी | - | आई, माता |
| जात्यांध | - | जन्मापासून अंध |
| जिता | - | जिवंत |
| जीव हरखणे | - | आनंदित होणे |
| जिव्हारी झोंबणे | - | मनाला लागणे |
| जीव घाबरा घुबरा होणे | - | भीती वाटणे |
| जीव घोटाळणे | - | मन गुंतणे |
| जीवनरस | - | जगण्याची दुर्दम्य इच्छा |
| जुजबी | - | किरकोळ |
| जीवट | - | जीवनाला लागलेली |
| **झ** | | |
| झापड | - | पेंग |
| झुंजूमुंजू होणे | - | उजाडणे, पहाट होणे |
| झिरा | - | झरा |
| झेलून | - | सोसून |

| | | |
|---|---|---|
| **ट** | | |
| टकुरं | - | डोके |
| टिटवं | - | प्रेतापुढे हातात धरलेले शिंकाळे |
| टिळा | - | गंधाचा ठिपका |
| ट्रंक कॉल | - | दूरध्वनीद्वारे परगावी द्यावयाचा संदेश |
| **ठ** | | |
| ठणका | - | वेदना |
| ठाण मांडणे | - | मुक्काम ठोकणे |
| **ड** | | |
| डहाळी | - | फांदी |
| डालते | - | झाकून ठेवते |
| डागण्या देणे | - | चटके देणे |
| डोळस | - | दृष्टी असणारा |
| **ढ, ण, त** | | |
| तह | - | करार, बोलणी |
| तडव | - | जाजम, चटई |
| तमा | - | काळजी |
| तनय | - | मुलगा पुत्र |
| तस्कर | - | चोर |
| तत्परु | - | तयार असणे |
| तडका फडकी | - | अचानक |
| तरास | - | त्रास |
| तुवा | - | तूं |
| तपाचार | - | तपश्चर्या |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| तेज:कण | - | तेजाचे किरण |
| तृणपाते | - | गवताचे पाते |
| तृप्ती | - | समाधान |
| तान्हे | - | लहान मूल |
| | **थ** | |
| थकवा | - | दम लागणे |
| | **द** | |
| दरवेशी | - | अस्वलाचे खेळ करणारा मनुष्य |
| दारुण | - | कठोर, घोर |
| दावं | - | जनावराच्या गळयात बांधायची दोरी |
| दिवास्वप्न | - | मनोराज्य |
| दिसं कासऱ्याला येणे | - | दुपार होणे |
| दीर्घोद्योग | - | सतत अभ्यास, काम |
| द्विज | - | ब्राह्मण, विप्र |
| दैवसीधू | - | नशिबाने मिळणे |
| दंडक | - | नियम, परिपाठ |
| दृष्टांत | - | दाखला, उदाहरण |
| | **ध** | |
| धरणी | - | जमीन |
| धुसमुस | - | आतल्या आत येणारा राग |
| धैर्यमेरु | - | पर्वताप्रमाणे अचल |
| धुंडाळणे | - | शोधणे |

| | | |
|---|---|---|
| | **न** | |
| नव्हाळी | - | नवीनता नावीन्य |
| न्याहाळी | - | निरखून पाहणे |
| नास्तिक | - | देव नाही असे मानणारा |
| निकाल | - | निर्णय |
| निभावणे | - | अचडणींतून मार्ग काढणे |
| नित्य | - | नेहमी |
| निंदक | - | निंदा करणारे |
| निम्मा | - | अर्धा |
| निवारणे | - | सोडविणे |
| निरक्षर | - | लिहिता वाचता न येणारा, अडाणी |
| नि:संकोच पणे | - | न लाजता |
| निर्वाणीचा | - | अखेरचा |
| निर्भय | - | धीट |
| निरुद्योगी | - | बेकार, काम नसलेले |
| निर्धास्त | - | निश्चिंत, काळजी न करता |
| नेटके | - | चांगले |
| न्हाती धुती | - | जमीन पेरण्या योग्य होणे |
| | **प** | |
| पविजे | - | मिळणे |
| पाऊ | - | पाय |
| पाहुणचार | - | आदरातिथ्य |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| पार | - | कट्टा |
| पढिये | - | प्रिय, आवडता |
| परिणय | - | विवाह |
| पट | - | वस्त्र |
| पसरणे | - | झोपणे, पहुडणे |
| परंपरा | - | रुढी पद्धत |
| पद्‌मनाभ | - | विष्णू |
| पंढरी राऊ | - | विठ्ठल |
| प्रभा | - | तेज |
| पांग फेडणे | - | उपकार फेडणे |
| पांदणी | - | शेतातून जाणारी अरुंदवाट |
| पिसाटापरी | - | वेडयासारखे |
| प्रभाती | - | सकाळी, पहाटे |
| पुरातन | - | जुना |
| पुंजका | - | गळणारे केस |
| पंतोजी | - | शिक्षक, आचार्य गुरु |
| पुंस | - | शेपूट |
| परार्थी | - | इतरांसाठी |
| पवन | - | वारा |
| पाठशिवणीचाखेळ | - | लपंडाव |
| पाटी | - | वेताची मोठी बुट्टी |
| पारखे होणे | - | न मिळणे |
| पाला | - | झाडांची ओली पाने |
| पूजन | - | पूजा |

| | | |
|---|---|---|
| पेर | - | ऊसाचे कांडे |
| पंथ | - | धार्मिक संघटना |
| पाझरणे | - | झिरपणे |
| पांग फिटणे | - | कष्टाचे सार्थक होणे |
| | **फ** | |
| फुफाटा | - | तापलेली जमीन |
| | **ब** | |
| बटकीण | - | दासी |
| बगलेत | - | काखेत |
| बाहू | - | हात, भुजा |
| बार बार | - | वरचेवर |
| बिळात | - | गुहेत |
| बिछायत | - | अंथरुण |
| बुध | - | शहाणा |
| बेगमी | - | तयारी |
| बोधितो | - | सांगतो |
| बोच | - | सल, दुःख |
| बहुवसु | - | पसरणे |
| बंदीशाळा | - | तुरुंग |
| बंड माजविणे | - | विरोध करणे |
| बांगडी फुटणे | - | युद्धात अनेक पुरुष मरण पावणे |
| | **भ** | |
| भणितले | - | म्हणाले |
| भवांबुधितरी | - | संसाररुपी समुद्रातून तारुन नेणारा |
| भांडणे | - | तंटा झगड |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| भान हरपणे | - | स्वतःला विसरणे |
| भवन | - | त्रिभुवन (स्वर्ग मृत्यू, पाताळ) |
| भवत्पद | - | परमेश्वराचे पाय |
| भेद | - | रहस्य |
| भुई | - | जमीन |
| भूषण | - | अलंकार |
| भूल | - | -मोहिनी, भुरळ |
| भूप | - | राजा, नृप |
| भेदून | - | छेदून |
| भावजय | - | भावाची बम्यलो |
| **म** | | |
| मशाल | - | जोश तारुण्याचे तेज |
| महिमान | - | महत्त्व |
| मढविन | - | सजवीन |
| मनसुबा | - | बेत |
| माय | - | माता |
| मसलत | - | युक्ती |
| माघारा | - | सासरी अस-लेल्या मुलीस माहेरी बोलविण्यास जाणारा मनुष्य, मुराळी |
| मृती | - | मरण, मृत्यू |
| मुजरा | - | वाकून केलेला नम स्कार |
| मोसम | - | ऋतू |
| मनःस्ताप | - | मनाला होणारे दुःख |
| मस्तक बधीर होणे | - | डोके सुन्न होणे |

| | | |
|---|---|---|
| मुलुख | - | प्रदेश, परराज्य |
| मृत्युंजय | - | मरणावर विजय मिळविलेला |
| मित्र | - | सूर्य |
| मौलिक | - | मौल्यवान, किंमती |
| **य** | | |
| याचक | - | भिक्षुक |
| यातायात | - | त्रास |
| याचना | - | विनंती |
| युग | - | मोठा कालविभाग |
| यौवन | - | तारुण्य |
| **र** | | |
| रवंथ करणे | - | चघळणे |
| रुद्धहोणे | - | भरुन येणे |
| रियाज | - | सराव |
| राजरोस | - | डोळ्या देखत, न घाबरता |
| रिघणे | - | शिरणे |
| रंध्र | - | छिद्र |
| **ल** | | |
| लकाकणे | - | चमकणे |
| लटक्या | - | खोटया |
| लई | - | फार |
| लाघवी | - | प्रेमळ |
| लख्ख करणे | - | स्वच्छ करणे |
| लुगडं | - | नऊवारी साडी |
| लेकुरवाळी | - | मुलेबाळे असणारी स्त्री |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| व | | |
|---|---|---|
| वजा | - | तऱ्हा, प्रकार |
| वणवा | - | जंगलातील आग |
| वस्तभाव | - | दागिने |
| वास्तव्य | - | राहणे |
| वाटणी | - | विभागणी |
| वाटुली | - | वाट, पायवाट |
| विसावा | - | विश्रांती |
| विझणे | - | मालवणे, थंड होणे |
| वर्तमान | - | बातमी |
| विजयध्वज | - | विजयाचा झेंडा |
| विश्वसंहार | - | जगाचा विनाश |
| विस्मरण | - | विसर |
| वादकु | - | वाद घालणारा |
| वेल मांडवाला चढणे | - | प्रगती होणे, भरभराट होणे |
| वैरणे | - | आधणामध्ये तांदूळ वगैरे ओतणे |
| वंचना | - | फसवणूक, प्रतारणा |

| श | | |
|---|---|---|
| शहदेणे | - | आक्रमण करणे |
| शून्य पंजर | - | रिकामा पिंजरा |
| शुक्र | - | पहाटे उगवणारा तारा |
| शबुद | - | शब्द, वचन |
| शालीन | - | नम्र |
| शिळ्या कढीला ऊत | - | गतकाळातील गोष्टी उकरुन काढणे |

| ष, स | | |
|---|---|---|
| सर्वज्ञ | - | श्री चक्रधरस्वामी |
| सर | - | पाऊस |
| समृद्ध | - | परिपूर्ण |
| सत्कार | - | गौरव |
| सदाचार | - | चांगले वर्तन |
| सकळ | - | सगळे |
| सरबराई करणे | - | आदरातिथ्य करणे |
| साहवे | - | सहन होते |
| साक्षात्कार | - | ईश्वरी कृपा |
| सासुरवास | - | सासरी होणारा जाच |
| सुधांशू | - | चंद्र |
| सृजन | - | नवनिर्मिती |
| सुरुंग | - | जमिनीत लांब, रुंद, खोल खणणे |
| सोवळे | - | पूजेच्यावेळी नेसावयाचे रेशमी वस्त्र |
| सुस्कारा | - | उसासा |
| सर्द होणे | - | चकित होणे |
| संतापाने भडकणे | - | रागाने चिडणे |
| स्वारी | - | आक्रमण |
| संन्यस्त | - | संन्याशाप्रमाणे |
| संचार | - | फिरणे |
| सत्व उचलणे | - | उत्कृष्ट निवडणे |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| संकल्प | - | इच्छा, मनोदय, हेतू |
| स्याहणे | - | शहाणे |
| स्वानुभव | - | स्वतःचा अनुभव |
| साचार | - | खरा |
| सुधा | - | सरळ |
| स्फुंदणे | - | रडणे |
| स्मरण | - | आठवण |
| संभ्रमी | - | गोंधळलेल्या अवस्थेत |
| संगरी | - | युद्धामध्ये |
| संक्षेपदेणे | - | मुरड घालणे |
| संप्रदाय | - | परंपरा, पंथ |
| समुदाय | - | समूह |
| सुन्या | - | रिकाम्या |
| समूळ | - | मुळासकट |
| सर्वस्थळी | - | सर्वठिकाणी |
| सांडलेले | - | पडलेले |
| | **ह** | |
| हस्ती | - | हत्ती |
| हरएक | - | प्रत्येक |
| हटातटाने | - | कठीण योग करुन, हट्ट करणे |
| हल्ला | - | तुटून पडणे, फस्त करणे |
| हरिक | - | हिरवळ |
| हिरवे कौतुक | - | हिरवे कोंब |
| हस्तगत होणे | - | जिंकणे मिळविणे |
| हिरवळ | - | मुद्दाम वाढवलेले मऊ गवत |
| हेटाळणी करणे | - | तिरस्कार करणे |
| हलकल्लोळ | - | गोंधळ |
| हैराण होणे | - | बेजार होणे |
| हौसमौज | - | इच्छापूर्ती |
| | **ळ, क्ष** | |
| क्षिती | - | पर्वा |
| क्षाळुनि | - | स्वच्छकरुन |
| क्षुद्र | - | हलके, क्षुल्लक |
| | **ज्ञ** | |
| ज्ञात | - | माहीत |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED